# प्रकरण तीन

## सामान्य प्रशासन विभाग

### 3.1 जिल्हा परिषदेच्या विविध विभागासाठी तसेच पंचायत समिती कार्यालयासाठी डिजीटल पोस्टल फ्रॅकिंग मशिन खरेदी करणेबाबत.

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 11,09,840/- खर्च करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त मागणी केलेल्या विभागापैकी ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांनी डिजीटल फ्रँकिंग मशिनची मागणी केलेली आहे. परंतु, ग्रामपंचायत विभागाने त्यांची मागणी रद्द केल्याने दिनांक 14/10/2015 अन्वये एकूण 12 नग फ्रँकिंग मशिनचा पुरवठा आदेश रद्द करून सुधारीत 11 नग फ्रँकिंग मशिन पुरविणेबाबत पुरवठा आदेश देणेबाबत अनिवार्य होते. परंतु, जिल्हा परिषदेने तसे केल्याचे संचिकेत दिसत नाही.

2) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-1088/(2512)/ उदयोग-6, दिनांक 02/01/1992 च्या अनुक्रमांक 8.2 व परिशिष्ट 6 मध्ये नमुद केल्याप्रमाणे लेंटीन आयोगाच्या शिफारशीनुसार खरेदी समितीतील सर्व सभासदांनी बैठकीपुर्वी प्रतिज्ञापत्र दयावयाचे आहे. सदर खरेदी संचिकेची तपासणी केली असता सदर प्रतिज्ञापत्र संचिकेत संलग्न नाही.

3) पुरवठा आदेशातील अटी व शर्ती क्रमांक 4 अन्वये दिनांक 13/11/2015 पर्यंतच्या मुदतीत जिल्हा परिषद व पंचायत समितीस पुरवठा करणे आवश्यक होते.

सदरचे फ्रँकिंग मशिन पुरवठा करतांना तब्बल दिनांक 14/11/2015 ते दिनांक 03/03/2016 पर्यंत, 3 महिने 20 दिवसांचा कालावधी लागला आहे. सदर रक्कम रुपये 1.00 लाखापेक्षा जास्त असल्याने रुपये 11,09,840/- वर 0.5 टक्के दंडाची रक्कम रुपये 5,549/- एवढी वसूल करुन शासन खाती भरणा करावी.

### 3.2 ग्रामपंचायत विभागाकडील ग्रामनिधी, 13 वा वित्त आयोग, संपुर्ण ग्रामिन योजना व जवाहर योजना यांच्या अपहारीत रक्कमा बाबत

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,94,11,983.08/- गुंतलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परिषद पालघर यांचे कडील ग्रामपंचायत विभागाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण दरम्यान तपासणीमध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत (लेखापरिक्षण) नियम 1961 चे नियम 19 अन्वये शोधुन काढलेली प्रकरणे जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाला कळविले जातात. सदर विभागाच्या कार्यालय प्रमुखाने अपराधी व्यक्तीचा शोध घेवुन त्याच्या विरुध्द त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत विभागाकडे अफरातफरची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. सदर बाब गंभीर असुन ग्रामपंचायत विभागाने सादर केलेल्या माहिती खालीलप्रमाणे असुन त्याबाबत लेखापरिक्षणास पडताळणी करता आलेली नाही.

सदर प्रकरणाची नोंद ही, ठाणे जिल्हा परिषदकडून प्रमाणित करुन घेवुन सदर अफरातफराची नोंद ही नोंदवहीत घेण्यात यावी.

उपरोक्त तपशिलात नमुद केलेल्या गुंतलेल्या रक्कमेची प्रकरणे त्वरीत निकाली काढुन रक्कम वसुल करणेसाठी त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक व्हिपीएम1584/प्र.क्र.1461/21, दिनांक 21/06/1984 नुसार ग्रामनिधीकडील अपहाराची प्रकरणे निकाली काढण्याची कार्यपध्दती देण्यात आलेली आहे. तसेच सदरची प्रकरणे ब-याच कालावधीपासुन प्रलंबीत असुन अशी प्रकरणे वर्षानुवर्ष प्रलंबित राहिल्याने त्या विषयाचे गांभिर्य कमी होवुन गुंतलेल्या रक्कमेची वसुली होणे कठीन होईल. तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक जरोयो/1093/36 ज21, दिनांक 01/05/1994 च्या परिपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे निष्काळजीपणा, चुका, नियमबाहय प्रदाने, हानी, अफरातफर इत्यादी बाबत

दोषी कर्मचाऱ्यांवर कार्यवाही केलेली नाही. याबाबत उचित खुलासा करावा व नियमोचित कार्यवाही करुन सदरची प्रकरणे त्वरीत निकाली काढुन रक्कम वसुल करुन लेखापरिक्षणास अनुपालन दर्शवावे.

**3.3 प्रलंबित अफरातफर प्रकरणाबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सामान्य प्रशासन (ग्रामपंचायत) विभाग

जिल्हा परिषद, रायगड सन 2015-2016 चे लेखापरीक्षण केले असता अफरातफर प्रकरणांची नोंदवही अपुर्ण असलेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परीषद, रायगड मध्ये एकूण 822 ग्रामपंचायती असुन सन 1965-1966 ते 2015-2016 अखेर i) ग्रामनिधी अपहाराची एकूण प्रकरणे 280 असून रक्कम रुपये 6,29,17,513/- गुंतलेली आहे. ii) संपूर्ण ग्रामिण रोजगार योजनेत 38 प्रकरणे असुन रक्कम रूपये 60,61,045/- गुंतलेली आहे. iii) जवाहर रोजगार योजनेत एकूण प्रकरणे 64 असुन रक्कम रुपये 81,76,712/- गुंतलेली आहे. iv) जवाहर ग्राम समृद्धी योजनेत एकूण प्रकरणे 16 असुन रक्कम रुपये 20,39,232/- एवढी रक्कम गुंतलेली असुन सदर रक्कम वसुलीबाबत ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद रायगड यांचेकडील स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाने लेखापरीक्षण कालावधीत सदर वित्तीय अनियमितता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, रायगड यांना सदरील ग्रामपंचायत लेखापरीक्षणातील संशयीत अपहाराची प्रकरणे वेळोवेळी सादर केलेली आहेत. सदर प्रकरणे निकाली काढल्याबाबतची माहीती उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांना या कार्यालयाचे अर्धसमास पत्र क्रमांक स्थानिलेप/लेप.शिबीर/ग्रा.प.वि./ अर्ध समासपत्र क्रमांक 03, दिनांक 22/06/2017 मधील अनुक्रमांक 09 नुसार अफरातफर प्रकरणांची नोंदवही मागणी केली असता नोंदवही अपूर्ण आहे.

2) स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडील संशयीत अपहार प्रकरणातील माहिती नुसार ग्रामपंचायत विभागाकडे रक्कम रुपये 7,91,94,502/- गुंतलेली असताना कार्यालयातील उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद, रायगड, गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील नियमानुसार संबंधित प्रकरणांची सखोल चौकशी करुन अपहारीत रक्कम संबंधिताकडून वसुली करून संबंधित लेखाशिर्षात जमा करावी.

**3.4 कंत्राटी ग्रामसेवक भरती प्रक्रियेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद रत्नागिरीमधील सामान्य प्रशासन विभागांतर्गत ग्रामपंचायत विभागाचे सन 2015-2016 या वर्षाचे लेखा परिक्षणात कंत्राटी ग्रामसेवक भरती प्रक्रिया सन 2015 राबविण्यात आली असून प्रगती इन्स्टीट्युट, रत्नागिरी या संस्थेस खर्च मंजूरी आदेश क्रमांक रजिप/साप्रवि/आस्था-5/2016, दिनांक 30/05/2016 अन्वये रक्कम रुपये 6,08,769/- प्रदान करण्यात आले आहे. या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने भरती प्रक्रियेसाठी निवडलेल्या संस्थेबाबत ई - निविदा व अन्य अभिलेख नस्तींची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) कंत्राटी ग्रामसेवक व अन्य पदांच्या भरतीसाठी ई-निविदा पद्धती वापरुन प्रगती इंस्टीटयूट, रत्नागिरी संस्थेची निवड करण्यात आल्याचे दिसून येते. याबाबत ई - निविदा सूचना साप्रवि 1/2015 निविदा अटी व शर्ती पत्र क्रमांक रजिप/साप्रवि/आस्था 5/निविदा 1/4678/2015, दिनांक 07/09/2015 नुसार दिलेल्या अटी व शर्ती संबंधीत संस्थेने पूर्ण करणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस 1094/(2679)/उद्योग 6, दिनांक 30/03/1994 मधील 1.4.1.7 मधील टिप (1) नुसार सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक 07/09/2015 चे पत्रान्वये भरती प्रक्रियेसाठी घातलेल्या अटी व शर्तींनुसार आवश्यक कागदपत्र या संस्थेने सादर करणे आवश्यक आहे. या कागदपत्रांपैकी एक जरी दस्तऐवज तांत्रिक लिफाफ्यात उपलब्ध नसेल, तर ती निविदा अग्राहृय समजण्यात यावी. तसेच व्यापारी लिफाफे उघडण्यात येऊ नयेत, अशा सूचना आहेत. सदर संस्थेचे संस्था नोंदणी प्रमाणपत्र, व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र नसतांना सदर संस्थेचे नाव भरती प्रकियेसाठी का निवडण्यात आले?

2) लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेल्या नस्तींची तपासणी केली असता अटी व शर्तींनुसार स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे बंधनकारक आहे. मात्र करारनामा केल्याचे अभिलेख नस्तीत आढळून आलेले नाहीत. अट क्रमांक 03 नुसार सुरक्षा अनामत रक्कम रुपये 20,000/- घेण्यात यावी असे नमूद आहे. मात्र याबाबत अभिलेखे नस्तीत दिसून आलेले नाहीत.

3) अट क्रमांक 21 नुसार सामाजिक व समांतर आरक्षणाच्या आधाराने गुणाच्या उतरत्या क्रमाने याद्या जिल्हा परिषदेस भरती प्रक्रिया करणाऱ्या संस्थेकडून पुरविण्याबाबत सूचित आहे. मात्र कंत्राटी ग्रामसेवक भरती अनुषंगाने नस्ती तपासली असता या नस्तीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी सदर याद्या स्वत:च्या स्वाक्षरीने तयार केल्याचे दिसून येते.

4) आयकर विवरणपत्रानुसार प्रगती इंस्टीटयुट, रत्नागिरी या संस्थेचे एकूण ढोबळ वार्षिक उत्पन्न (Total Gross Income) अवघे रुपये 2,03,290/- इतके कमी असतांना या संस्थेची वार्षिक उलाढाल अथवा बँक गॅरंटी न घेता एवढे मोठे काम कोणत्या आधारे देण्यात आले?

5) करारातील अटीनुसार परीक्षा भरती प्रकियेस आवश्यक साधन सामग्री सदर संस्थेने पुरविणे बंधनकारक आहे. मात्र सदर संस्थेने सादर केलेले अभिलेख पाहता याबाबत उपलब्ध साधन सामग्रीची तपशिलवार माहिती जिल्हा परिषदेस सादर केलेली नाही. फक्त आवश्यक साधन सामग्री उपलब्ध असल्याचे पत्र दिले आहे. उपलब्ध साधन सामग्रीची तपशिलवार माहिती सादर केलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक प्रानिम/1214/289/प्र.क्र.108/14/13 अ, दिनांक 11/03/2015 तसेच ग्रामविकास विभागाचे परिपत्रक क्रमांक एपिटी 2014/प्र.क्र.139/आस्था 8, दिनांक 21/03/2015 मधील परिच्छेद क्रमांक 03 नुसार मे. महाऑनलाईन लि. किंवा टाटा कन्सल्टन्सी लि. यांचा भरती प्रक्रिया कार्यक्रमांसाठी वापर करण्याच्या सूचना आहेत. तरी खाजगी संस्था निवडल्यामुळे भरती बाबतची पारदर्शकता, गोपनीयता याबाबत अचूकता संस्थेकडून ठेवली जाईल, याबाबत खात्री करता येत नाही. त्यामुळे अशा प्रकारे संस्था निवडणे शासकीय नियमानुसार अभिप्रेत नाही.

7) सदर भरती प्रकिया करण्यासाठी शासनाची पूर्व परवानगी घेतली असल्याचे कोणतेही अभिलेखे नस्तीत नाहीत.

8) सदर भरती प्रक्रिया करण्यासाठी निवडलेल्या संस्थेस देय असलेल्या खर्चास शासनाची मंजूरी घेण्यात आलेली नाही.

### 3.5 जिल्हा परिषद परिक्षा खाते क्रमांक 60213265981 मधून नियमबाहय खरेदीबाबत.

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परिषद, रत्नागिरी अंतर्गत सामान्य प्रशासन विभागाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण केले असता, परिक्षेच्या फीच्या जमा असलेल्या रक्कमेतून रूपये 6,21,535/- संगणक व इतर साहित्याची खरेदी करण्यात आली असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) उद्योग, उर्जा व कामगार विभाग खरेदी शासन निर्णय क्रमांक भांखस 2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 अनुक्रमांक 11 तसेच 3.1.1.2 नुसार संगणक खरेदीसाठी प्रथम प्रशासकीय मंजूरीचे आदेश काढून तसेच खरेदीची आवश्यकता आहे आणि खरेदी वस्तूंचा विनियोग तातडीने केला जाणार आहे, असे प्रमाणित करणे बंधनकारक आहे. मात्र अशी कोणतीही कार्यवाही करण्यात आल्याचे नस्तीतील अभिलेख्यांवरुन दिसून येत नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा.

2) वरील शासन निर्णय दिनांक 30/10/2015 मधील 3.2.3 नुसार खरेदीचे मोठे आदेश लहान लहान आदेशामध्ये विभागणी करुन खरेदी करुन ती स्थानिक दरपत्रकाच्या माध्यमातून खरेदी करणे टाळावे, असे नमूद असतांना स्थानिक पुरवठादाराकडून खरेदी का करण्यात आली?

3) वरील शासन निर्णयातील तरतूदींनुसार स्थानिक पुरवठादारांचे हित जपण्याचे काम खरेदी अधिकाऱ्यांनी करु नये. तसेच अशी खरेदी रूपये 3,00,000/- वरील असल्यास ई-निविदा प्रक्रिया करुन खरेदी करणे आवश्यक होते. मात्र तसे करण्यात आलेले नाही.

4) वरीलप्रमाणे दर्शविलेले साहित्य मोठया प्रमाणावर परिक्षेच्या भरती प्रक्रियेसाठी खरेदी करण्यात आल्याचे दिसून येते. भरती प्रक्रिया सन 2015 चे काम खाजगी संस्थेस देण्यात आले असतांना व मक्तेदाराशी परिक्षेसाठी लागणाऱ्या साहित्यासह दर करार केला असतांना परिक्षेसाठी पुन्हा मोठया प्रमाणात साहित्य खरेदी करण्याची आवश्यकता नव्हती.

5) परिक्षा खात्यात जमा झालेल्या पैशातून कोणत्या प्रयोजनासाठी खर्च करता येतो, याबाबतचा शासन निर्णय अथवा काही शासनाचे निर्देश असल्यास त्याबाबतच्या प्रती लेखापरिक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत.

6) मुळ लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक 5 मधील तक्त्यातील अनुक्रमांक 1,5,6,7,11 वरील साहित्याच्या खरेदीबाबतची प्रमाणके खरेदी नस्तीत उपलब्ध नाहीत. वित्त विभागाकडील नस्ती लेखापरिक्षणास तपासणीसाठी उपलब्ध झालेल्या नसल्याने लेखापरिक्षण करता आलेले नाही. तसेच अनुक्रमांक 2 वरील नस्ती लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे खरेदी प्रकरणे तपासता आली नाहीत.

7) वरील खरेदी तपशिलाचे मंजूरी आदेश तपासले असता, खर्च मंजूरीचे आदेशात वित्तीय प्राधिकार तसेच वित्तीय मर्यादा यांचा तपशिल नमूद करण्यात आलेला नाही. खरेदी मंजूरी आदेश हे खर्चाच्या पूर्ण रकमेचे (Gross Amount) असणे आवश्यक असतांना ते निव्वळ रकमेचे (Net Amount) काढण्यात आले आहेत.

8) मुळ लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक 5 मधील तक्त्यातील अनुक्रमांक 10 वरील रक्कम रुपये 87,000/- किमतीचे 05 टॅब खरेदी केलेले आहेत. मात्र वित्त विभागाकडील तसेच विभागाची नस्ती तपासली असता सदर प्रदान हे मुळ प्रमाणकाशिवाय छायाप्रतीच्या आधारावर प्रदान करण्यात आल्याचे दिसून येते. मुळ प्रमाणक नसतांना कोणत्या नियमानुसार संबंधीत संस्थेस प्रदान करण्यात आले आहे.

**3.6 अफरातफर प्रकरणांबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** ग्रामपंचायत विभागाकडील अफरातफर नोंदवही तपासली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) परिच्छेद ब-याच कालावधीपासुन प्रलंबित आहेत. त्याची पुर्तता ग्रामपंचायत विभागाने ग्रामपंचायत स्तरावरुन केलेली दिसुन येत नाही. सदरचे परिच्छेद निकाली न काढल्याने मोठया प्रमाणात रकमा गुंतलेल्या आहेत.

2) ग्रामनिधीकडील मार्च 2016 अखेर एकुण 162 प्रकरणे प्रलंबित असुन त्यामुध्ये गुंतलेली रक्कम रुपये 5,65,98,483/- इतकी आहे. त्यापैकी 12 प्रकरणांची रक्कम रुपये 44,30,527/- वसुली दिसते व शिल्लक प्रकरणे 150 असुन त्यामध्ये गुंतलेली रक्कम रुपये 5,21,67,956/- वसुल करणेची प्रलंबित आहे.

3) जवाहर रोजगार योजना / जवाहर ग्रामसमृध्द योजना/संपुर्ण ग्रामीण रोजगार योजनेकडील मार्च 2016 अखेर एकुण 127 प्रकरणे प्रलंबित असुन त्यामध्ये गुंतलेली रक्कम रुपये 1,95,36,904/- इतकी आहे. त्यापैकी 7 प्रकरणांची रक्कम रुपये 37,71,634/- वसुली दिसते व शिल्लक प्रकरणे 120 असुन त्यामध्ये गुंतलेली रक्कम रुपये 1,57,65,270/- वसुली करणेची प्रलंबित आहे.

4) नोंदवही व विवरणपत्रामध्ये वसुल अगर समायोजन झाल्याचे नमुद केलेले नाही. वसुल केलेल्या रकमांमध्ये रोख वसुली किती झाली? याचा तपशिल उपलब्ध नाही. तरी रोख वसुली केलेल्या रकमेबाबतच्या पावत्या, चलने, वेतन देयकातुन वसुली केली असल्यास त्याचा प्रमाणक क्रमांक व दिनांक वसुल केलेली रक्कम इत्यादी तपशिल व अनुषंगिक कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत. तसेच समायोजनाने केलेल्या वसुलीबाबतची प्रमाणके, उपप्रमाणके व अनुषंगिक लेखे उपलब्ध झाली नाहीत. हा सर्व तपशिल स्थानिक निधी लेखा विभागास सादर करुन अफरातफरीची प्रकरणे निकाली काढण्याबाबतची कार्यवाही होणे आवश्यक आहे. तरी त्याबाबत पुर्तता करावी.

5) तरी वसुल होणारी अफरातफरीची एकुण रक्कम रुपये 6,79,33,226/- संबंधितांकडुन वसुल करुन पुर्तता दाखववी.

**3.7 ग्रामपंचायत विभागाकडील प्रलंबित खास प्रतिवृत्तातील अपहारीत रक्कमांबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत 685 प्रकरणांमध्ये रक्कम रुपये 5,36,52,636/- गुंतलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त नमुद तपशिलाप्रमाणे ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधी व जवाहर रोजगार योजना निधीच्या लेखापरीक्षामध्ये निदर्शनास असलेल्या गैरव्यवहाराची एकूण 685 प्रकरणे असून त्यात रुपये 5,36,52,636/- इतकी रक्कम गुंतलेली नमुद केलेली आहे. परंतु, बोजा चढविली 35 प्रकरणांची रक्कम रूपये 25,87,768/- व खटला दाखल केलेली प्रकरणे 44 रक्कम रूपये 54,47,772/- वरील थकीत रक्कमेतुन कमी केलेली आहे. त्यामुळे एकुण गुंतलेली रक्कम कमी दिसत असुन ती रक्कम रुपये 4,56,17,096/- अशी आहे.

2) बोजा चढविलेली 35 प्रकरणे व खटला दाखल केलेली 44 प्रकरणे यांचे बाबतीत बोजा चढविला किंवा खटला दाखल केल्यामुळे रक्कम वसुल झालेली नाही. त्यामुळे प्रत्यक्ष रक्कम वसुल होईपर्यंत रक्कम थकीत रक्कमेतुन कमी करणे नियमबाहय आहे. तसेच याबाबत सतत पाठपुरावा करणे आवश्यक आहे. तरी याबाबत साधार खुलासा करुन अनुपालन दर्शवावे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-2005 /प्र.क्र. 262/पं.स.3/ दिनांक 03/09/2005 व शासन निर्णय क्रमांक डिईएन-2006/प्र.क्र.771/आस्था-12, दिनांक 28/09/2006 नुसार अपहारीत प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करणे आवश्यक असतांना, याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नाही.

**3.8 ग्रामपंचायत / जवाहर रोजगार योजना / जवाहर ग्रामसमृध्दी योजना ग्रामीण रोजगार योजनांचा अपहार प्रकरणांबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** याबाबत रूपये 6,88,41,447/- इतका खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) ग्रामपंचायत / जवाहर रोजगार योजना / जवाहर ग्रामसमृध्दी योजना / संपुर्ण ग्रामीण रोजगार योजनांचा अपहार प्रकरणे निकाली काढून रक्कमा वसूल करणेसाठी कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणे बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असून, त्यात गुंतलेल्या रकमासुध्दा मोठया प्रमाणात आहेत. अशी प्रकरणे वर्षानुवर्ष प्रलंबित राहिल्याने त्या विषयाची गांभिर्यता व परिणामकारता कमी होत जाते. अशा प्रकरणांवर वेळीच कार्यवाही न केल्याने लबाडी / अपहार करणारे कमर्चाऱ्यांवर वेळीच कार्यवाही होऊ शकत नाही. परिणामी, रकमेच्या वसुलीबाबत विलंब होतो. ग्रामपंचायतमधील व्यवहार अभिलेखे तपासणीसाठी विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) ही पदे प्रशासनाने निर्माण केलेली असतांना अपहार / लबाडी प्रकरणे वर्षानुवर्ष प्रलंबित का राहतात? यासंदर्भात विभागाने नियमोचित खुलासा लेखापरीक्षणास सादर करावा. तसेच कालाव्ययामुळे अशा रक्कमांची वसुली होणे दुरापस्त होते. आजतागायत ज्या काही अपहार / लबाडी प्रकरणांच्या बाबतीत जिल्हा परिषदेने कार्यवाही पूर्ण करुन आदेश निर्गमित केले आहेत. त्यांचे अवलोकन केले असता, बऱ्याच प्रकरणी अपचारी व्यक्ती / ग्रामसेवक मयत झालेचे दिसून येते. तसेच अपचारी कर्मचाऱ्याने जी काही शासकीय रक्क्म लेख्यांबाहेर ठेवली, अशा कर्मचाऱ्यांकडून सदरची रक्क्म दंडनिहाय व्याजासह वसूल केल्याचे दिसून येत नाही. सदरची बाब गंभीर स्वरुपाची असलेने अशा प्रकरणांबाबत वेळीच कार्यवाही न केल्याने संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन शासकीय रक्कमेची नियमोचित वसुली केली जात नाही. तसेच याबाबत कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन प्रकरणे त्वरीत निकाली काढून गंभीर अनियमिततांच्या संदर्भात नियमोचित कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

**3.9 जिल्हा परिषद नंदुरबार अंतर्गत सरळसेवा भरती 2015 बाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 2,88,790/- इतका खर्च करण्यात आला आहे. त्याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2015/प्र.क्र.41/अर्थ 1, दिनांक 02/06/2015 अन्वये गट क व ड मधील शिक्षक ग्रामसेवक आरोग्य परिचारीका व पशुधन पर्यवेक्षक इत्यादी पदांना भरती करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. भरती प्रक्रीयेसाठी निर्मल Software Service Pvt. Ltd. पुणे यांचा सर्वात कमी दर रूपये 54/- प्रति उमेदवार मंजूर केलेला आहे. मक्तेदाराने 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन दिलेला आहे. करारनाम्यानुसार भरती प्रकीयेसाठी लागणारे संपुर्ण साहित्य संगणक प्रिंटर स्कॅनर छपाई झेरॉक्स OMR machine संगणक सिस्टिम व ॲप्लिकेशन सॉप्टवेअर, स्टेशनरी जनरेटर इत्यादी अनुषंगीक साहित्य संबंधीत संस्थेचे असणार आहे. जिल्हा परिषद प्रशासनाकडून फक्त बंदिस्त हॉल उपलब्ध् केला जाईल, असे नमुद असताना जिल्हा परिषदेने रक्कम रूपये 2,88,790/- किंमतीची स्टेशनरी खरेदी करुन भरती प्रक्रीयेसाठी वापर केलेला आहे. त्यामुळे सदरचा खर्च लेखापरिक्षणास अमान्य करण्यात येत आहे.

### 3.10 ग्रामपंचायतीकडील अफरातफर प्रकरणांची वसुलीबाबत.

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखापरीक्षा नियम 1961 चे नियम 19 अन्वये शोधुन काढलेली लबाडीची अथवा कोणत्याही संशयास्पद परिस्थितीवरुन वाजवी अनुमान काढलेली प्रकरणे संबधीत सरपंच व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, नंदुरबार यांना गोपनियरित्या कळविले जातात. लेखा परीक्षणाबाबत विशेष अहवाल सादर केले असतांना दिनांक 31/03/2016 अखेर 263 प्रलंबित प्रकरणांमध्ये रक्कम रूपये 3,28,49,070/- गुंतलेली आहे.

स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयातील प्रकरणांचा ताळमेळ घेऊन अंतिम निकाली प्रकरणांबाबत खात्री करावी व अफरातफर प्रकारणांबाबत त्वरीत कार्यवाही करुन रक्कमांची वसुली करावी.

### 3.11 ग्रामपंचायतीतील अफरातफर प्रकरणांबाबत.

**जिल्हा परिषद जळगाव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडील दिनांक 31/03/2016 अखेर विविध योजनांमध्ये गुंतलेली रक्कम रूपये 6,11,52,532.38/- वसुल करणे प्रलंबित आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) विभागाने सन 2014-2015 अखेर मागील अहवालातील परिच्छेद क्रमांक 4 नुसार ग्रामनिधी / जवाहर रोजगार योजना / जवाहर ग्रामसमृध्दी योजना व ग्रामपंचायतीमधील एकुण 740 अफरातफर प्रकरणांमध्ये एकुण गुंतलेली रक्कम रुपये 6,42,09,498.08/- एवढी दर्शविलेली असल्याचे दिसुन येते. सन 2015-2016 मध्ये एकुण 695 प्रकरणे प्रलंबित असल्याचे दर्शविण्यांत आलेले आहे. एकुण 45 प्रकरणे कमी दर्शविण्यांत आलेली आहे. तसेच सुरवातीची शिल्लक रक्कम रूपये 8,29,88,367.96/- अफरातफर प्रकरणांमध्ये गुंतलेली रक्कमेची माहिती विभागाने पुरविण्यात आलेली आहे. त्यामुळे सन 2015-2016 मध्ये सुरवातीची शिल्लक प्रकरणे व रक्कम रुपये 1,87,78,869.00/- ने जादा दर्शविलेली आहे. यावरुन विभागाकडुन शासनास अचुक माहिती पुरविण्यांत आलेली नसल्याचे दिसुन येते. तरी फरकाच्या रक्कमेबाबत अनुपालन सादर करावे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक टी.पी.एम/2687/3020/21, दिनांक 05/07/1989 अन्वये ग्रामपंचायतीतील अपहाराची प्रकरणे हाताळणेसाठी अवलंब करावयाची कार्यपध्दती दिलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-2005/प्र.क्र.262/ पंरास-3, दिनांक 03/09/2005 अन्वये ग्रामपंचायत आर्थिक व्यवहारात मालमत्ता अथवा निधीचा अपहार करण्यास जबाबदार असणारे सरपंच, उपसरपंच, सदस्य सचिव, कर्मचारी किंवा हजर संबधीत व्यक्ती यांच्याकडून अपहारीत मालमत्ता / रक्कम बरोबरच त्यांच्या विरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही प्रस्तावीत करावी.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक डी.ई.एस. 2006/प्र.क्र.771/ आस्था-12, दिनांक 28/09/2006 अन्वये ग्रामपंचायत अपहार विस्तार अधिकारी, कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता, गटविकास अधिकारी यांना ही जबाबदार धरण्यात यावे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 1096/प्र.क्र.115/ 21-अ, दिनांक 27/06/1996 अन्वये विस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी, उपमुख्य कार्यवारी अधिकारी (ग्रामपंचायत) व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दरमहा पंचायतीचे तपासणी / निरीक्षण करणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरिक्षणांस दाखविण्यांत यावे.

**3.12 ग्रामपंचायतीनां कर्मचारी किमान वेतन, सरपंच मानधन, सदस्य बैठक भत्ता अनुदान वितरणाबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई व्हीपीएम-2012/प्र.क्र.243/पंरा-3, दिनांक 30/10/2013 अन्वये ग्रामपंचायत कर्मचारी यांना किमान वेतन व राहाणीमान भत्ता अनुज्ञेय करण्यांत आलेला आहे. तसेच व्ही.पी.एम-2011/प्र.क्र.40/पंरा-3 दिनांक 06/09/2014 अन्वये सरपंच मानधन व सदस्य बैठक भत्याचे अनुदानाचे वितरण करण्यांत येते. लेखापरीक्षण वर्ष सन 2015-2016 मध्ये रक्कम रुपये 9,06,27,000/- इतके सरपंच मानधन, सदस्य बैठक भत्ता, व कर्मचारी किमान वेतनासाठी अनुदान प्राप्त झालेले आहे. त्यापैकी रक्कम रुपये 8,97,19,911/- इतके अनुदान पंचायत समिती स्तरावर वितरित करण्यांत आलेले आहे व रक्कम रुपये 9,07,089/- इतके अनुदान अखर्चित राहिलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

1) जळगांव जिल्हयातील ग्रामपंचायतनिहाय ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत कुशल, अर्धकुशल, अकुशल कर्मचाऱ्यांची मंजुर आराखडयानुसारची माहिती जिल्हा परिषदेमध्ये उपलब्ध झाली नाही. त्यामुळे अचुक अनुदानाचे वितरण झालेबाबत खात्री करता आली नाही. त्यामुळे रक्कम रुपये 8,97,19,911/- ही लेखापरीक्षणांत प्रमाणित करण्यांत येत नाही. सदरची माहिती उपलब्ध करण्यांत येवुन अचुक अनुदान वितरीत केले बाबत खात्री पटविण्यांत यावी.

2) सन 2015-2016 मध्ये रक्कम रुपये 9,07,089/- इतके अनुदान अखर्चित आहे. यावरुन विभागाने अचुक अंदाजपत्रक सादर केलेले नसल्याचे निदर्शनास येते.

3) जळगांव जिल्हयातील ग्रामपंचायतनिहाय ग्रामपंचायत लोकसंख्येची माहिती लेखापरीक्षणांस उपलब्ध झाली नाही. त्यामुळे अचुक अनुदानाचे वितरण झालेबाबत खात्री करता आली नाही. सदरची माहिती उपलब्ध करण्यांत येवुन अचुक अनुदान वितरीत केलेबाबत खात्री पटविण्यांत यावी.

4) जळगांव जिल्हयातील ग्रामपंचायतनिहाय ग्रामपंचायतीमध्ये सन 2015-2016 मध्ये झालेल्या बैठक संख्याची माहिती शासन निर्णयानुसार 15 एप्रिल पर्यत जिल्हा परिषदेस प्राप्त करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे ग्रामपंचायतनिहाय माहिती घेणेत आलेली नाही.

5) पंचायत समिती स्तरावर अनुदान वितरित केलेनंतर पंचायत समिती स्तरावरील पोहच पावती नमुना नंबर 7 प्राप्त करण्यांत आलेल्या नाहीत.

**3.13 निवासस्थानासाठी अनुज्ञाप्ती शुल्काची वसूलीबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक घभाव-2010/प्र.क्र.-4/सेवा-5, दिनांक 19/04/2011 अन्वये कर्तव्यस्थानी दिलेल्या शासकीय निवासस्थानासाठी अनुज्ञाप्ती शुल्काची दिनांक 01/05/2011 पासून वित्तमान सेवाशुल्क दुप्पट करण्यांत आलेले आहे. जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागातील वेतन देयकांची पडताळणी केली असता, माहे फेब्रुवारी 2016 पेड मार्च 2016 चे वेतन देयकात अधिकारी यांची अनुज्ञाप्ती सेवाशुल्क रक्कम रुपये 84,000/- वसूल केलेली नाही.

**3.14 शासकिय निवासस्थान मुख्यालयी उपलब्ध असतांना घरभाडे प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद, सामान्य प्रशासन विभागातील वेतन देयकांची पडताळणी केली असता, यांच्याकडील माहे फेब्रुवारी 2016 पेड मार्च 2016 चे वेतन

देयकात एकूण 10 अधिकारी यांना निवासस्थान मुख्यालयी उपलब्ध असतांना घरभाडे देय नाही. तरी घरभाडे भत्ता रक्कम रुपये 2,98,728/- नियमबाह्य प्रदान केलेला आहे.

**3.15 व्यायाम शाळा साहित्य संच पुरविणे योजनेतील अनियमितते बाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सन 2014-2015 ग्रामपंचायतींना 10 टक्के हिस्सा व जिल्हा परिषद 90 टक्के हिस्सा याप्रमाणे व्यायामशाळा साहित्य पुरवठा करणेची योजना राबवलेली होती. त्यातील पुरवठा केलेली 36 नगांपैकी देणे बाकी राहिलेली रक्कम रूपये 22,08,006/- पुरवठादारास अदा केली होती. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ई निविदा अटी शर्तीमध्ये संचाची यांत्रिक तपासणी प्राचार्य शासनाकडील तंत्र निकेतन अथवा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र यांचेकडून करून घेणे आवश्यक असताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पत्र देऊन उपअभियंता यांत्रिकी उपविभाग भूजल सर्वेक्षण, पुणे यांचेकडून पुरवठा आदेश पूर्व व पश्चात तपासणी केलेली आहे. शासनमान्य त्रयस्थ संस्थेकडून तपासणी नसलेने व आपल्या विभागामार्फत तपासणी केलेने योग्य त्या गुणवत्ता अहवालाबाबत शाश्वती देता येत नाही.

2) पुरवठा आदेश अटीप्रमाणे ग्रामपंचायतींना साहित्य वाटप केल्यानंतर ग्रामसेवकाची पोहोच वा त्यांनी साहित्य जमा घेतलेची साठा नोंद क्रमांक माहिती देणेची होती. तथापि, जिल्हा परिषद, पुणेकडे पंचायतींनी साहित्य साठा नोंद घेतलेबाबत साठा नोंदवही पान क्रमांक माहिती नस्तीसोबत नव्हती. तसेच पुरवठा आदेश सोबत प्रत्येक संचात पुरवठा करावयाचे व्यायामशाळा साहित्य तपशीलवार यादी दिलेबाबत नस्तीवरून दिसून आले नाही.

3) सदर योजनेचे खर्चास तांत्रिक मान्यता दिनांक 08/08/2014 प्रशासन विभागाकडील असताना पुरवठादार यास दिनांक 16/07/2014 रोजी साहित्य संच पुरवठा करणेचे आदेश आहेत. तरी तांत्रिक मान्यता आगोदर पुरवठा आदेश दिलेने नियमबाह्यता झालेली आहे.

4) साहित्य खरेदीसाठी निविदा प्रसिद्धीकरण दोनच ‘अ’ वर्गाच्या दैनिक वर्तमानपत्रात केलेली आहे. तसेच एकच दिवस जाहिरात प्रसिद्धी दिली आहे. योजनेवर सन 2014-2015 वर्षातील खर्चासह रक्कम रुपये 5,54,55,768/- (408 नग रक्कम रुपये 1,35,921/- प्रमाणे) रक्कम खर्च आहे. योजना मोठी असलेने त्यासाठी व्यापक प्रमाणात प्रसिद्धीकरण केलेचे दिसून येत नाही.

5) योजनेची मास्टर नोंदवही तपासणीत योजना सन 2010-2011 पासून सुरु आहे व काही ग्रामपंचायतींना तिच्या वाड्या, वस्त्यासह 3 ते 4 वेळा योजनाचा लाभ दिलेला दिसतो. जिल्ह्यातील 1408 ग्रामपंचायतींना साहित्य पुरवठा करणेसाठी वर्षनिहाय आराखडा तयार करून योजना राबविणे आवश्यक असताना तसे केलेचे दिसून येत नाही. योजनेची उपयुक्तता, फलनिश्चिती, योजना पुढे चालू ठेवणेबाबतची आवश्यकता याबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आलेले नाहीत.

6) सन 2013-2014 मधील न्यूनतम निविदाधारक MSSIDC पुणे यांचेशी पत्रव्यवहार केला किंवा कसे? याबाबत कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.

7) पुरवठादाराशी केलेली करारनामा रक्कम रूपये 5 कोटी वरील आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 116 प्रमाणे करारपत्र जिल्हा परिषद च्या सामान्य मुद्रेने मोहोरबंद करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

8) निविदा मार्गदर्शक सूचनानुसार निविदाधारकाने पुरवठा उपलब्धतेनुसार पुरवठा करणे आवश्यक आहे. पुरवठा आदेश एकच असताना पुरवठादार याने तीन टप्प्यात साहित्य 3 टप्प्यात साहित्य संच पुरवठा केला आहे. तरी पुरवठा अटी / शर्ती व करारपत्र अटी शर्ती प्रमाणे प्रति आठवडा 2 टक्के विलंब रक्कम केलेली नाही. आता साहित्य संच पुरवठा करणेची मुदत, पोहोच साहित्य दिनांक, झालेला विलंब कालावधी, विलंबाने पुरवठा केलेला साहित्य रक्कम व त्यावर 2 टक्के होणारी विलंब रक्कम परिगणना करून तेवढी रक्कम पुरवठादार यांचेकडून वसूल करून जिल्हा परिषद निधीत जमा घेतलेची पूर्तता दाखवावी.

9) पुरवठा आदेश अटीप्रमाणे 25टक्के संचाची गुणवत्ताबाबत तपासणी तांत्रिक समिती / यांत्रिक विभाग जिल्हा परिषद यांचेकडून करून घेणे बंधनकारक असून त्यानंतर देयक अदा केले जाईल, म्हणून स्पष्ट करणेत आलेले आहे. तथापि, अशाप्रकारे तपासणी केले बाबत अहवाल नस्ती सोबत नाहीत.

**3.16 केश कर्तनालय खुर्ची खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद निधीतून जिल्ह्यातील केश कर्तनालय लाभार्थी यांना केश कर्तनालय खुर्ची वाटप करणेसाठी खुर्ची खरेदीवर रक्कम रूपये 59,83,430/- खर्च करण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निविदा मागविताना नवभारत दैनिक दिनांक 17/11/2015 रोजी प्रसिद्धीकरण केलेले आहे. जास्त खपाच्या 3 दैनिकात प्रसिद्धीकरण केलेले नाही.

2) खरेदी समितीत रक्कम रुपये 18,000/- प्रति नगाची किंमत ठरविणेत आलेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांचे दिनांक 09/11/2015 चे पत्र होते. तथापि, पूजा एन्टरप्रायझेस यांचे लघुत्तम दर वाटाघाटीने रुपये 19,490/- अंतिम केलेला होता. सदरबाबत फेर निविदा काढलेली नाही.

3) लाभार्थी प्रस्ताव तालुक्यातून होऊन लाभार्थी अंतिम यादी केलेली नाही. पुरवठा आदेशासोबत 307 लाभार्थींना साहित्य वाटप करणेबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहीने यादी जोडलेली आहे. तथापि, प्रस्ताव न घेता केलेली लाभार्थी यादी मान्य करता येत नाही.

4) पुरवठा आदेशावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांची दिनांक 23/12/2015 रोजीची दिनांकित सही असताना पुरवठा आदेश क्रमांक 154, दिनांक 05/02/2016 रोजी काढणेत आलेला आहे. तरी पुरवठा आदेश उशिरा का काढणेत आला? याबाबत खुलासा करावा. प्रस्ताव व लाभार्थी यादी अंतिम नसताना साहित्य खरेदी प्रस्ताव केलेचे यावरून दिसते.

5) पुरवठा आदेशामध्ये हवेलीसाठी 90 खुर्ची पंचायत समिती येथे पुरवठा करणेचे होते, असे असताना 60 खुर्ची हवेली व 30 खुर्ची लोणीकंद येथे पोहोचबाबत ग्रामविकास अधिकारी यांच्या सहीने पोहोच होती. याबाबत खुलासा करणेत यावा. तसेच लाभार्थी यादी पाहता हवेली मधील 78 लाभार्थी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहीने यादी होती. म्हणजे 12 खुर्ची लाभार्थी निवड नसताना पुरवठा केलेचे दिसते. सदरबाबत वाढीव लाभार्थी यादी दाखविणेत यावी.

6) शिरूरसाठी 23 खुर्ची पुरवठा होता. प्रत्यक्षात उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहीने 25 लाभार्थी यादी निश्चित केलेली होती. कमी खुर्ची वाटप का केले? याबाबत खुलासा करावा.

7) उपरोक्त आदेशाने गटविकास अधिकारी यांचेकडे पुरवठा करणेत आलेल्या खुर्च्या प्रस्तावासह मंजूर लाभार्थींना तालुका स्तरावर (लोणीकंद येथील खुर्च्या पुरवठासह) वाटप केलेचे पोहोच स्वाक्षरीसह दाखविणेत याव्यात.

8) पुरवठा आदेशात साहित्य गटविकास अधिकारी यांनी नमुने प्रमाणे तपासून ताब्यात घेणेबाबत व ते मंजूर लाभार्थींना वाटप करणेबाबत आदेश नस्तीला पाहणेस मिळाले नाहीत.

9) लाभार्थी निवड निकषाबाबत तपशील उपलब्ध झाला नाही. तो देऊन निकषाप्रमाणे लाभार्थी निवडबाबत प्रस्ताव दाखविणेत यावेत.

10) पुरवठा केलेल्या साहित्यापैकी 10 टक्के साहित्याची प्रतवारी निविदेतील साहित्य वर्णन व दर्जानुसार असलेबाबत तपासणी शासनमान्य संस्था / शासकीय संस्था यांचेकडून करून घेतलेबाबत अहवाल प्रमाणपत्र नाही.

11) मागील लेखापरीक्षण अहवाल पाहता सन 2014-2015 मध्ये सदर योजनेत खुर्ची खरेदी आहेत. तरी आता लाभार्थी मस्टर नोंदवही दाखवून जिल्हा परिषदेकडील या योजनेत दुबार लाभ नसलेबाबत खात्री पटवावी.

12) साहित्य उपयोगिता प्रमाणपत्र दाखविणेत यावेत.

**3.17 ग्रामपंचायत हद्दीतील भजनी मंडळांना भजनी साहित्य पुरविणे.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** जिल्हा परिषद निधीतून ग्रामपंचायत हद्दीतील भजनी मंडळांना भजनी साहित्य वाटप करणेसाठी भजनी साहित्य खरेदीवर रक्कम रूपये 37,36,500/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी रुपये 27 लक्ष खर्चास घेणेत आलेली होती. वाढीव खर्चास प्रशासकीय मंजुरी घेतलेली नाही. (तरतूद नंतर वाढ केलेली आहे.)

2) तांत्रिक मंजूर आदेशाप्रमाणे मंडळाची निवड ग्रामसभेत करणे आवश्यक आहे. भजनी मंडळ कार्यरत असले बाबत ग्रामसेवक दाखला, साहित्य देखभाल करणे तसेच साहित्य ठेवणेस जागा उपलब्ध असलेबाबत भजनी मंडळ हमीपत्र, जिल्हा परिषदेकडून मागील 5 वर्षात इतर योजना मधून साहित्य प्राप्त न झालेबाबतचा ग्रामसेवक दाखला इत्यादी कागदपत्रासह साहित्य मागणीबाबतचे प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. 106 + 53 संचाबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहीने भजनी मंडळी यादी दप्तरी होती.

3) तालुका स्तरावर भजनी मंडळ प्रस्तावाप्रमाणे साहित्य संच वाटप पुरवठा आदेशाप्रमाणे दिनांक 30/03/2016 पर्यंत साहित्य पंचायत समितीकडे पोहोच करणेचे होते. तथापि, गटविकास अधिकारी यांचेकडील पोहोच वर साहित्य पोहोच दिनांक नमूद नाहीत. त्यामुळे वेळेत साहित्य पोहोच झालेची खात्री होत नाही.

4) दिनांक 21/03/2016 ने 53 संच पुरवठाबाबत आदेश सोबत कोणत्या मंडळास साहित्य पोहोच देणेचे आहे. याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहीने मंडळ यादी जोडलेली नव्हती. सदर संचापैकी 26 संच हवेली, 7 संच शिरूरकडे व 20 संच लोणीकंद येथे पोहोचबाबत झेरोक्स डिलेव्हरी चलने दप्तरी होते. पुरवठा आदेशांत लोणीकंद येथे संच पुरविणेबाबत तसेच संच पंचायतीच्या कोणत्या अधिकारी / कर्मचारी यांनी संच ताब्यात घेतले, त्याची जमा साठा नोंद याबाबत तपशील नाही. तरी याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहीने लाभार्थी मंडळे यादी निश्चिती केलेची यादीसह त्यांना साहित्य संच वाटप केलेचे पोहोच दाखविण्यात याव्यात.

5) पुरवठा आदेश क्रमांक 1 मध्ये नमूद केले प्रमाणे शिरूरसाठी 17 संच व हवेलीसाठी 28 संच पुरवठा असताना कोणतीही वाढीव लाभार्थी यादी प्रस्तावासह उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांचे सहीने निश्चित न करता हवेलीसाठी 26 संच शिरूर साठी 7 संचाचा वाढीव पुरवठा होता. तसेच लोणीकंद येथे 20 संच पुरवठा होता. दोन तालुकेसाठी जादा साहित्य संच लाभार्थी प्रस्ताव मंजुरी न घेता पुरवठा केलेने नियमबाह्यता झालेली आहे.

6) पुरवठा आदेशातील अटी प्रमाणे गटविकास अधिकारी यांचेकडे पोहोच साहित्यापैकी 10 टक्के साहित्याची प्रतवारी निविदेतील साहित्य वर्णन व दर्जानुसार असलेबाबत तपासणी शासकीय / शासनमान्य औद्योगिक केंद्र / संस्था यांचेकडून करून तपासणी प्रमाणपत्र उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना पुरवठादार यांनी सादर करणे बंधनकारक असताना अशी तपासणी केलेचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

7) पुरवठा आदेशात साहित्य संच पंचायत समिती येथे पोहोच करणेचे होते. तथापि, गटविकास अधिकारी यांना साहित्य ताब्यात नमुन्याप्रमाणे तपासून घेणेबाबत कळविणेचे आदेश पहाणेस मिळाले नाहीत. तसेच पुरवठा साहित्य नमूद भजनी मंडळांना वाटप करणेबाबत आदेश पत्रही नाही.

8) भजनी मंडळासाठी साहित्य खरेदी पुर्वी गटविकास अधिकारी यांचेकडून लाभार्थी यादी घेतलेचे दप्तरी दिसून आलेले नाही.

9) साहित्य उपयोगिता प्रमाणपत्रे दाखविणेत यावेत.

**3.18 तीर्थक्षेत्र विकास सोलर पथदिवे बसविणे खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 33) -** जिल्हा परिषद पुणे सामान्य प्रशासन विभाग (ग्रामपंचायत विभाग) यांचेकडे जिल्हा नियोजन प्राप्त निधीतून तीर्थक्षेत्र विकास योजनेत तीर्थक्षेत्र ठिकाणी पथदिवे बसविणे यावर रक्कम रूपये 53,24,536/- खर्च करण्यात आली होती. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खर्चास तांत्रिक मान्यताबाबत जिल्हा परिषद पुणे कडील मान्यता प्राप्त नस्ती सोबत नाही.

2) 14 देवस्थाने यांचेकडे सोलर स्ट्रीट लाईट पथदिवे बसविणेसाठी जिल्हा परिषद स्तरावर पुरवठा आदेश देऊन काम केलेले असताना जि.प./पंचा/14/377/15 दिनांक 30/11/2015 ने 14 देवस्थानांना रुपये 68 लक्ष अनुदान वितरण केलेचा आदेश नस्तीस होता. तसेच सदर आदेश खरेदी प्रक्रिया नंतरचा होता. याबाबत खुलासा करणेत यावा.

3) देवस्थांनाकडे साहित्य पुरवठाबाबत साहित्य पोहोच डिलेव्हरी चलने नस्तीस होती. तथा त्यावर साहित्य पोहोच तारखा नमूद नव्हत्या. त्यामुळे मुदतीत साहित्य पोहोच झालेचे कळून येत नाही.

4) पुरवठा आदेशबाबत संबंधीत देवस्थान यांचेकडे नमूद केलेले सोलर स्ट्रीट लाईट दिवे त्यांचेकडे पुरवठा आदेशाप्रमाणे बरोबर प्राप्त होऊन ते तांत्रिकदृष्ट्या बरोबर बसवून मिळाले म्हणून प्रमाणित पोहोच दिनांकासह देणेबाबत आदेश नस्तीत नाही. त्यामुळे मान्य नमुन्याप्रमाणे साहित्य पोहोच झालेची खात्री होत नाही.

5) एकूण साहित्य पुरवठा रकमेच्या 80 टक्के रक्कम वरीलप्रमाणे पुरवठादारास अदा केली होती. 20 टक्के रक्कम कोणत्या कारणासाठी राखून ठेवली? याबाबत तपशील देणेत यावा.

6) संबंधीत देवस्थान यांचेकडील साहित्य विनियोग दाखले घेतलेचे दिसून आलेले नाहीत.

**3.19 अपहार प्रकरणे नियमबाहयपणे निकाली काढलेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** स्थानिक निधी लेखा विभागाकडून ग्रामपंचायतीच्या लेखापरीक्षणानंतर संशयित अपहार प्रकरणांबाबत खास अहवाल जिल्हा परिषदेकडे पाठविला जातो व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 140(4) व (5) नुसार अशा प्रकरणांच्या चौकशीअंती पूर्तता सादर केल्यावर प्रकरण निकाली काढले जाते. ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक टीपीएम/2687/3020/21, दिनांक 05/07/1989 अन्वये अपहार प्रकरणे हाताळण्याबाबतची कार्यवाही नमूद केलेली असून त्यानुसार कार्यवाही न झालेचे निकाली प्रकरणांपैकी केवळ एका प्रकरणाचे चाचणीदाखल अनुपालन तपासता दिसून आले. याबाबतचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

प्रकरण क्रमांक 105 ग्रामपंचायत बावधन, तालुका वाई - गुंतलेली रक्कम रूपये 40,91,770/-

1) मूल्यांकनाशिवाय केलेला खर्च रूपये 28,74,767/-.

2) अनुपालनासोबत सादर केलेल्या मूल्यांकनांच्या छायांकित प्रतींवर कोठेही उपअभियंता, वाई यांची स्वाक्षरी नाही. कामांचे पूर्णत्वाचे दाखले नसलेने काम पुर्ण आहे अथवा नाही, याबाबतचा खुलासा केलेला नाही.

3) मोजमापांवर केवळ एखाद्या बाबीवर तपासलेची स्वाक्षरी असून ती कोणत्या अधिकाऱ्याची आहे? याबाबतचा कोणताही तपशिल नमूद नाही.

4) लेखापरीक्षण अहवालातील मुद्दा क्रमांक 4 नुसार कामाच्या देयकातून शासकीय कपाती, जसे की आयकर 2 टक्के, वॅट 4 टक्के, कामगार विमा 1 टक्के इ, कपाती केलेल्या नसताना सदर कपांतीची वसूली करुन न घेता अनुपालन मंजुर करण्यात आलेले आहे.

5) परिच्छेदात नमूद काम हायस्कूलसमोर क्रिडांगण सपाटीकरण करणे कामाची मोजमाप नोंदवही सादर करण्यात आलेली असून त्यानुसार कामासाठी 238.54 क्यु.मी. इतका मुरुम वापरण्यात आलेला आहे. तथापि, रूपये 70.67/- प्रती क्यू.मी. प्रमाणे होणारी रॉयल्टी रूपये 47,708/- वसूल करण्यात आलेली नसताना अनुपालन मंजुर करण्यात आलेले आहे.

6) लेखापरीक्षणाने दर्शविलेल्या कमी जमा रक्कमांबाबत केवळ वसूली करुन पूर्तता मान्य केली जाते. तथापि, अशा रक्कमा प्रदीर्घ कालावधीपर्यंत संबंधीताने वापरल्याबाबत कोणतीही दंडात्मक कारवाई केली जात नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक डीईएस 2006/प्र.क्र.771/आस्था 12, दिनांक 28/09/2006 अन्वये ग्रामपंचायत अपहार प्रकरणी संबंधीत विस्तार अधिकारी, शाखा अभियंता, गटविकास अधिकारी यांनाही जबाबदार धरण्यात यावे, असे नमूद असताना केवळ ग्रामसेवकावरच कारवाई करण्यात आलेली असून संबंधीत विस्तार अधिकारी व गटविकास अधिकारी यांचेवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

याबाबत यापुढे योग्य ती कारवाई करणेबाबतची दक्षता घेणे आवश्यक आहे. अन्यथा, अपहार करण्याची प्रवृत्ती वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.20 मुद्रांक शुल्क अनुदान वाटपातील अनियिमततेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हयातील ग्रामपंचायतींना मुद्रांक शुल्क अनुदान वितरीत करण्यासाठी तालुकास्तरावर रक्कम रुपये 17,41,16,500/- वर्ग करण्यात आलेले असून त्यावर लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दिनांक 29/03/2016 च्या मान्य टिपणीनुसार लोणंद व कोरेगाव ग्रामपंचायतींचे नगरपंचायतीत रुपांतर झालेने त्यांना वितरीत करावयाच्या अनुदानाची रक्कम रुपये 39,67,193/- राखून ठेवण्यात आलेली आहे. वास्तविक अशा रक्कमा हया संबंधीतांच्याच असल्याने व नगरपंचायत झाल्यानंतर संबंधीतास न देणेबाबतचे कोणतेही शासन आदेश नसताना विकासकामांच्या उपयोगी ठरणारी रक्कम सामान्य प्रशासन विभागाने नियमबाहयपणे अवितरीत ठेवली आहे. अशी रक्कम नगरविकास विभागामार्फत देणेसाठी शासनास किंवा नगरविकास विभागास वर्ग करता आली असती. तथापि, तशीही कोणतीही कार्यवाही न करता अनुदानाची रक्कम नाहक जिल्हापरिषदेकडे शिल्लक ठेवली आहे.

2) मुद्रांक शुल्क अनुदान हे ग्रामपंचायतीचे महत्वाचे उत्पन्न असून त्यावर मागासवर्गीयांसाठीचा खर्च (15 टक्के) तसेच अपंगांसाठीचा खर्च (3 टक्के) अवलंबून असताना अशा अनुदानामधून नियमबाह्यपणे ऑडिट वसूलीच्या रक्कमा, जिल्हाग्रामविकास निधी कर्जाच्या रक्कमा व अन्य वसूल्या करण्यात आलेल्या आहेत.

3) जिल्हयातील खालीलप्रमाणे 72 गावे ही बुडीतग्रस्त असलेने त्यांच्या नावे आलेले अनुदान न देता राखून ठेवण्यात आलेले आहे.

सदर ग्रामपंचातीचे अनुदान संबंधीत पुर्नवसित ग्रामपंचायतीस किंवा परत शासनास पाठविण्याबाबतची कार्यवाही करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न करता अनुदान अनावश्यकपणे राखून ठेवलेले आहे.

**3.21 वाहन खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** लेखापरीक्षण कालवधीत आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे मंजुरीनुसार घसारा निधीतून खालीलप्रमाणे वाहने खरेदी करण्यात आलेली असून त्यावर लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) मे.कणसे अॅटो व्हील्स प्रा. लि. सातारा यांचेकडील खरेदी देयकानुसार वाहनाची शोरुम किंमत रुपये 7,98,000/- असून विमा, नोंदणी व अन्य साहित्यासाठी रुपये 30,509/- धनादेश क्रमांक 706918 ने जमा केलेचे नस्तीसोबतच्या कागदपत्रांनुसार दिसून येते. शासन परिपत्रक, ग्रामविकास विभाग दिनांक 01/12/2014 नुसार शासकिय वाहन खरेदीची मर्यादा वाहनाची किंमत, विक्रीकर, विमासह सहाय्यभूत बाबींसह 8 लाखाच्या मर्यादेत करणेबाबतच्या सूचना आहेत. विभागाने नस्तीसोबतची कागदपत्रे पाहता एकूण रूपये 8,28,509/- (7,98,000 + 30,509) इतका खर्च केलेला असून उपरोक्त शासन परिपत्रकातील मर्यादेनुसार रुपये 28,509/- इतका जादा खर्च अन्य निधीतून केलेला आहे. सदर खर्च मान्य करता येणार नसून तो संबंधीत लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक आहे.

2) जुने वाहन क्रमांक MH 11 AB 777 हे यांत्रिकी विभागाकडे जमा केलेबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत नसलेने सदर वाहनाचाही वापर चालू असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) प्रमाणक क्रमांक 2, दिनांक 08/10/2015 रुपये 6,00,000/- TOYOTA Etios G DSK मोटर्स सातारा हया स्थानिक पुरवठादाराकडून दरपत्रकाआधारे वाहन खरेदी केलेले आहे. तथापि, Ministry of Commerce & Industry Director Genral of Supply & Disposal यांचे दरकरानुसार टोयाटो किर्लोस्कर मोटर्स प्रा. लि. यांचेशीही शासन दरकरार झालेले असलेचे दिसून येते. त्यामुळे खरेदीपूर्वी शासन दरकरारानुसार दराची खात्री करणे

आवश्यक होते. तशी कार्यवाही न केलेने दरकरारातील किंमतीपेक्षा जादा किमतीस खरेदी झाली नसलेबाबत कागदोपत्री पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

4) स्पर्धात्मक लाभासाठी कंपनीच्या संकेतस्थळावर तसेच अन्य जिल्ह्यामधील पुरवठादाराकडून किंमत योग्य व वाजवी असलेबाबतची खात्री केलेचे दिसून येत नाही.

5) वाहन क्रमांक MH 11 AB 318 (Bolaro) शासन दरकरारानुसार महिंद्रा अ‍ॅण्ड महिंद्रा कं. मुंबई यांचेकडून वाहन खरेदी असून कंपनीने सादर केलेल्या देयकामध्ये नाशिक सातारा वाहतूक चार्जेस रूपये 9,243/- अतिरिक्त घेतलेले असून दरकरारामध्ये सदर बाबीचा समावेश नाही. तसेच वाहन जिल्हयातील वितरकाकडून पोहोच करणे अपेक्षित असताना नाशिकवरुन वाहन पोहचविल्याने रुपये 9,243/- चा जादा खर्च झालेला असून तो लेखापरीक्षणात मान्य करता येणार नाही. सदर खर्च संबंधीताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

## 3.22 'क' वर्ग तीर्थक्षेत्र (यात्रा स्थळांच्या) ठिकाणी विकास कामांवरील अनुदान वाटप.

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा नियोजन समिती सांगलीसाठी दिनांक 07/06/2015 रोजीच्या सभेमध्ये मंजुर निधी रूपये 4,48,50,000/- इतका केलेला आहे. सदर निधी विभागाने दिनांक 20/08/2015 ते दिनांक 18/01/2016 पर्यंत कोषागारातून रूपये 3,50,10,000/- इतका निधी आहरीत केला आहे. 'क' वर्ग तीर्क्षक्षेत्रासाठी एकूण 112 कामांसाठी प्रशासकीय मंजूरी घेण्यात आलेली आहे. आहरीत केलेली रक्कम पंचायत समिती स्तरावरील एकूण 10 तालुक्यांना अनुदान वितरीत केलेले आहे. वितरीत केलेले अनुदान व तालुकास्तरावरील केलेला खर्च महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तीर्थवि/1011/प्र.क्र.651/योजना 7, दिनांक 16/11/2012 च्या अटी व शर्तीच्या अधीन राहून खर्च करणे आवश्यक आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) 'क' वर्ग दर्जाचे तीर्थक्षेत्र नमूद केलेप्रमाणे 112 तीर्थक्षेत्रांचे भाविकांचे (यात्रेत) 1 लाखापेक्षा जास्त उपस्थिती प्रमाणपत्र जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी प्रमाणित केलेले नाही.

2) शासन निर्णयाप्रमाणे हाती घेतलेल्या रस्त्याची कामे मुख्य क्षेत्रापासून सर्वसाधारण 800 ते 1000 मीटर अंतराच्या आतील असलेबाबत कागदपत्रे नस्तीसोबत दिसून आले नाहीत.

3) मंजुर कामावरील जास्तीत जास्त खर्च संरक्षण भिंत बांधकाम, वाहनस्थळ पेव्हींग ब्लॉक यासाठी खर्च केल्याचा आढळून येतो. परंतु, शासन निर्णयानुसार पायाभूत सुविधामध्ये स्त्री व पुरूष शौचालये व स्नानगृहे बांधण्यासाठी निधी प्राधान्याने वापरणे आवश्यक होते. तथापी, तशी कार्यवाही केलेली नाही.

4) शासन निर्णयाप्रमाणे 'क' वर्ग ग्रामीण तीर्क्षक्षेत्र विकासासाठी निधीची मर्यादा प्रतीवर्ष 30 लाखपर्यंत घेणेची तरतूद आहे. त्याप्रमाणे विभागाने 10 तालुक्यासाठी 3 कोटी (3000000 × 10) इतकी रक्कम आहरीत करणे आवश्यक होते. परंतु, विभागाने रूपये 3,50,10,000/- इतकी रक्कम आहरीत केलेली आहे. यामुळे रूपये 50,10,000/- जादा रक्कम आहरीत करून शासन निर्णय दिनांक 16/11/2012 चे उल्लंघन केलेले आहे.

5) मंजुर निधी वितरीत केल्यानंतर अनुदानाचा विनियोग 2 वर्षाच्या आत करणेचे असताना, निधी खर्च केल्याचा विनियोग दाखला / विनियोग प्रमाणपत्रे उपलब्ध झाली नाहीत. सर्व कामे विहित कालावधीत पूर्ण झालेचे लेखे प्रस्तुत करावेत.

## 3.23 लोक प्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील कामाबाबत.

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सामान्य प्रशासन विभाग (ग्रामपंचायत विभाग) जिल्हा परिषद, सांगली सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणामध्ये लोक प्रतिनिधींनी सुचविलेली ग्रामीण भागातील कामाच्या नस्तीमधील उणीवाबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 5, दिनांक 29/08/2017 निर्गमित करण्यात आले होते. त्याचे उत्तर प्राप्त झाले नाही.

ग्रामपंचायत विभागाकडे लोक प्रतिनिधींनी सुचविलेल्या कामाअंतर्गत सन 2015-2016 मधील रक्कम रुपये 75,60,000/- तरतूद प्राप्त आहे. सदर तरतूदीतुन ग्रामपंचायतीस वितरीत केलेले अनुदानातून कोणतेही काम झालेले नाही. यावरून अनावश्यकरित्या रक्कम आहरीत केलेचे दिसून येते.

**3.24 ग्रामपंचायत विभागाकरिता ग्रामपंचायत तपासणी सॉफ्टवेअर बनविणेबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सामान्य प्रशासन विभाग (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, सांगली सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखा परीक्षणामध्ये ग्रामपंचायत विभागाकरिता ऑडिट व ग्रामपंचायत तपासणी सॉफ्टवेअर बनविणेसाठी रक्कम रूपये 67,000/- खर्च केलेला आहे. सदर नस्तीमधील उणीवाबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे घेण्यात येत आहे.

1) सदर सेवा अंतर्गत पुरवठादाराचा करारनामा उपलब्ध नाही.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखसं-2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 नुसार रुपये 5,000/- पेक्षा जास्त परंतु रुपये 3,00,000/- पर्यंतच्या साहित्याची खरेदी दरपत्रके मागवुन करणे बंधनकारक आहे. या प्रक्रियेबाबतची कागदपत्रे नाहीत.

3) पुरवठादाराचे पुरवठा केलेबाबत सेवाकर भरणा केलेबाबत चलन उपलब्ध झाले नाही.

4) सदर कामाच्या मुल्यमापनासाठी मानांकनाप्रमाणे गुणनियंत्रण चाचणीचा NIC कडुन तांत्रिक सक्षमतेचा अहवाल घेणे बंधनकारक आहे. त्याबाबत अहवाल प्राप्त नाही.

**3.25 जिल्हा वार्षिक योजनेतर्गत मोठ्या ग्रामपंचायतीना नागरी सुविधांसाठी विशेष अुनदान वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** मोठ्या ग्रामपंचायतीचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, औद्याागिक, कृषी आणि वाणिज्य विकासाठी प्राधान्याने राहणीमान दर्जेदार होणेसाठी शहराच्या तोडीच्या मुलभुत सुविधा व रोजगार संधी उपलब्ध करुन देणेकरीता त्या दृष्टीने अशा गावांचा स्वतंत्र विचार करुन मोठ्या ग्रामपंचायतीना नागरी सुविधासाठी विशेष अनुदान गटांना वाटप करणेत आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम/2610/ प्र.क्र.129/पंरा-4, दिनांक 16/09/2010 अन्वये ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या 5,000 पेक्षा जास्त आहे. अशा ग्रामपंचायतीची निवड सन 2015-2016 मध्ये केली त्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या 5,000 पेक्षा जास्त असलेचे दाखला तहसिलदार यांचा घेणे आवश्यक आहे.

2) सन 2014-2015 अखेर रक्कम रूपये 6,10,61,766/- शिल्लक आहेत. ती रक्कम किती कामांची शिल्लक आहे. त्या कामाची मंजुर यादी लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्यामुळे सन 2015-2016 मध्ये झालेला खर्च मागील अपूर्ण कामाचा आहे किंवा कसे समजुन येत नाही. तरी आता पुर्ण झालेल्या कामाची यादी व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 190 (2) नुसार सक्षम अधिकाऱ्यांचे सही व शिक्याचे काम पुर्णत्वाचे दाखले उपलब्ध करुन झालेला खर्च योग्य असलेबाबत खात्री करुन देणे आवश्यक आहे.

3) सन 2015-2016 मध्ये एकुण 94 कामापैकी 15 कामे पुर्ण झाले आहेत. त्यांचे समक्ष अधिकाऱ्याचे काम पूर्णत्वाचे दाखल दप्तरी उपलब्ध करणे आवशयक आहे. तसेच बाकी 79 कामे अपुर्ण आहेत. त्यांची रक्कम रूपये 8,73,26,016/- इतकी शिल्लक आहे. ती पुढील वर्षी पुर्ण करुन सक्षम अधिकाऱ्यांचे काम पुर्णत्वाचे दाखले नमुना नंबर 65 दप्तरी दाखल करणे आवश्यक आहे.

4) गटविकास अधिकारी यांचेकडुन सदर कामाचे अनुदान ग्रामपंचायतीने त्याच कारणासाठी वापराले असलेबाबत उपयोगिता प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

5) सदर योजनेअंतर्गत कामाना प्रशासकिय मंजुरी व तांत्रिक मंजुरी दिलेली आहे. त्या कामांची नोंदवही दप्तरी ठेवलेली नाही.

6) सामान्य प्रशासन विभागाकडील ग्रामपंचायत विभागाने गटांना अनुदान वाटप केलेले आहे. त्यांची अनुदान नोंदवही दप्तरी ठेवलेली नाही.

**3.26 पर्यावरण ग्राम समृध्दी योजने अंतर्गत सौर पथदिवे पूरवणे योजना.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत रक्कम रूपये 92,43,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पूरवठादार एजन्सी व जिल्हा परिषद कोल्हापूर मध्ये झालेल्या करारपत्रातील अट क्र.3 नुसार सदर पथदिवे दिनांक 31/12/2013 पर्यत अस्थापीत करणेबाबत नमूद केले आहे. पण कामपूर्णत्वाचा दाखला नसल्यामूळे सदर काम कधी पूर्ण झाले हे समजुन येत नाही.

2) सदर करारपत्रातील अट क्र.17 नुसार काम पूर्ण न झाल्यास अपूर्ण कामाच्या 0.5 टक्के प्रति आठवडा, जास्तीत जास्त 10 टक्के दंड देयकातुन कपात करणे बाबत सूचीत केले आहे. त्यामुळे दंडाची परिगणना करुन प्रत्यक्षात बसणारा दंड वसूल करण्यात यावा.

3) मेडा दरकरार अट 12 (ड) प्रमाणे बसविलेले पथदिवे स्पेसिफिकेशन प्रमाणे आहेत किंवा कसे याची पडताळणी करणे आवश्यक असून जिल्हा परिषद प्रशासनाने बसवलेल्या पथदिव्यांची RANDOM तांत्रिक तपासणी करणेस मेडा च्या तांत्रिक अधिकाऱ्यांना कळविले आहे. त्याप्रमाणे सर्व गटातील ग्रामपंचायतीची तपासणी करणे आवश्यक असताना 12 गटापैकी केवळ 4 गटातील 64 ग्रामपंचायतीची तपासणी केली आहे. त्यामुळे उर्वरित 8 गटातील ग्रामपंचायतीची RANDOM तांत्रिक तपासणी केलेली नाही.

4) सदर पुरवठादार कंपनीने उभारलेल्या एकुण सौरपथदिव्यापैंकी किती सौरपथदिवे सुस्थितीत चालु आहेत व किती सौर दिवे नादुरुस्त असून दुरुस्त / बदली केली याचा तिमाही अहवाल लेखापरिक्षणास सादर करणे आवश्यक आहे.

**3.27 नागरी सुविधा योजनेतून ग्रामपंचायतींना प्रदान केलेल्या अनुदानातून वजातीच्या (विक्रीकर, विमा, उपकर व गौणखनिज) रक्कमा वसुल न केलेबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सोलापूर चे सन 2015-2016 चे लेखा परिक्षणांवेळी ग्रामपंचायत विभागाकडील लेखे तपासले असता जिल्हयातील ग्रामपंचायातींना नागरी सुविधा योजनेअंतर्गत अनुदान प्रदान केले आहे. परंतु, सदर बांधकामाच्या अनुदानातून वजातीच्या रक्कमा (विक्रीकर, विमा, उपकर व गौणखनिज) वसुल केल्याचे दिसून आले आहे. यावर खालील अभिप्राय आहेत.

1) 52 ग्रामपंचायतींना नागरी सुविधा योजनेअंतर्गत अनुदान प्रदान केले आहे. यात विक्रीकर, विमा, उपकर व गौणखनिज रक्कमाही ग्रामपंचायातीस अदा केल्या आहेत. आता परिशिष्टांत नमुद केल्याप्रमाणे एकूण रक्कम रुपये 54,71,457/- संबंधीत संस्थेकडे (विक्रीकर विभाग, विमा संचालनालय, तहसिलदार इत्यादी) भरणा केल्याचे चलने सादर करावीत. अन्यथा, ग्रामपंचायतीकडून वसुल करुन शासनाकडे भरणा करणे आवश्यक आहे.

2) काही गौणखनिज रक्कमेचे विवरण संचिकेत प्राप्त झाले नाही.

**3.28 सन 2015-16 मध्ये विविध विभागाकडुन जिल्हा परिषद मुद्रणालयातून छपाई करुन घेतल्याबाबत प्राप्त झालेल्या धनादेशाच्या नोंदी रोखवहीत जमा न घेतल्याबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सन 2015-16 मध्ये जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागास विवीध विभागाकडुन प्राप्त झालेल्या धनादेशाच्या नोंदी किरकोळ रोखवही नमुना 04 मध्ये घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केलेली नाही. धनादेश प्राप्त नोंदवही नमुना 11 ची तपासणी केली असता सन 2015-16 मध्ये धनादेश प्राप्त झाले आहेत. यावर लेखापरिक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील प्रमाणे धनादेशद्वारे प्राप्त झालेली रक्कम रूपये 16,53,489/- च्या नोंदी रोखवही नमुना 04 मध्ये घेण्यात आलेल्या नाहीत तसेच रोखवही लेखापरिक्षणास सादर केलेली नाही.

2) धनादेश क्रमांक 063615 दिनांक 25/08/2015रोजी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडुन प्राप्त झालेली रक्कम रूपये 7,050/- बँकेमध्ये भरणा केलीबाबत दर्शविली आहे. परंतु चलान लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिली नाही. चलनासह अनुपालन दर्शवावे.

3) समाजकल्याण अधिकारी यांचे धनादेश क्रमांक 073724, दिनांक 22/03/2016 अन्वये रूपये 3,150/- व भु.सं.विकास यंत्रणा अमरावती यांचेकडून धनादेश क्रमांक 055593, दिनांक 22/03/2016 अन्वये रक्कम रूपये 6,916/- प्राप्त झाले. परंतु खाते क्रमांक 65/4 खात्यात जमा आढळून आले नाही.

**3.29 बॉयोमेट्रीक अटेंडन्स मशीन खरेदी खर्चातील अनियमीतता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अमरावती यांनी सन 2015-16 या वित्तीय वर्षात जिल्हा वार्षीक योजना मधुन प्राप्त अनुदानातुन नावीन्य पुर्ण योजने अंतर्गत 11 विभागाकरीता 11 बॉयोमेट्रीक अटेंडन्स मशीन प्रति नग 18900/- प्रमाणे खरेदी प्रमाणक क्रमांक 4707, दिनांक 31/03/2016 रक्कम रूपये 2,07,900/- अन्वये खरेदी केल्या आहेत. यावर लेखापरिक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 11 नग बॉयोमेट्रीक अटेंडन्स मशीन पुरवठा करण्यासाठी तीन पुरवठादाराची दरपत्रके प्राप्त झाली आहेत. सदर दरपत्रक मागविण्याबाबत पुरवठादारासोबत केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत लेखापरिक्षणाला उपलब्ध झाली नाही. प्राप्त झालेल्या दरपत्रकावर कार्यालयाचा आवक क्रमांक नमुद नसल्याचे आढळले, सदरचे दरपत्रक सिल बंद लखोटयात असल्याबाबत लखोटे लेखापरिक्षणात उपलब्ध झाले नाही, दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्याला सक्षम प्राधीकरणांची मंजुरी घेतली नसल्याचे आढळले. वरील बाबीचा विचार करता 11 नग बॉयोमेट्रीक मशीन खरेदी करुन नंतर दरपत्रके मागविल्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) वरील विवरणातील बॉयोमेट्रीक मशीन च्या स्पेसिफिकेशनच्या मशीनचे प्रचलित बाजारभाव रक्कम रुपये 9,500/- ते रुपये 10,400/- च्या दरम्यान असतांना प्रचलित बाजारभावापेक्षा जादा किंमत देवुन खरेदी केल्याचे आढळुन येते.

3) बॉयोमेट्रीक मशीनची खरेदी ई निवीदा करुन खरेदी केली असती तर व्यापक प्रसिध्दी होवुन स्पर्धात्मक भावाचा फायदा जिल्हा परिषदेला झाला असता. वित्तीय औचित्याच्या सुत्राचे पालन न केल्याने शासन निधीचे नुकसान झाले आहे.

4) मुल्यवर्धीत कराची 2 टक्के रक्कम रुपये 4,158/- कपात करणे आवश्यक असतांना मुल्यवर्धीत कराची रक्कम कपात केली नाही. सबब रक्कम रुपये 4,158/- वसुल करुन शासन खाती भरणा करावी.

**3.30 मुद्रणालयावर करण्यात आलेल्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागाच्या सन 2015-2016 लेखापरिक्षणात विभागाअंतर्गत असलेल्या जिल्हा परिषद मुद्रणालयाच्या अभिलेख्याची सन 2011-12 ते 2015-16 च्या अभिलेख्याची मागणी करुन ही पुर्णपणे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाही. उपलब्ध अभिलेख्याची तपासणी केली असता लेखापरिक्षणाचे खालील अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेने केलेल्या अंतर्गत तपासणीवरुन अध्यक्ष चौकशी समिती यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना पत्र क्रमांक 5747, दिनांक 07/09/2015 रोजी सादर केलेल्या अहवालावरुन पुढीलप्रमाणे रकमा जिल्हा परिषद सेस खाते क्रमांक 64/4 मध्ये जमा करण्यात आल्या नाहीत. धनादेश प्राप्त होऊनही सेस निधी खाते क्रमांक 64/4 मध्ये जमा न झालेली रक्कम रुपये 5,874/-, छपाई बाबतच्या वसुली अभावी प्रलंबीत असलेली रक्कम रुपये 52,50,556/-, भरती परिक्षणार्थीवर झालेला जादा खर्च (खर्च रुपये 25,02,466 - जमा रुपये 8,08,565 = रुपये 16,93,901/- जादा खर्च) रक्कम रुपये 16,93,901/-, साठा नोंदवहीत कमी साठा

असलेल्या वस्तुची किंमत रुपये 22,924/- तसेच दिनांक 04/10/2011 ते 28/02/2015 पर्यंत मुद्राणलयाची जमा झालेली रक्कम रुपये 2,70,86,946/- चे 30 टक्के रक्कम रूपये 81,26,084/-मधून केवळ रुपये 13,80,252/- एवढी रक्कम जिल्हा निधीत जमा केली असून उर्वरित रक्कम रुपये 67,45,832/- जमा होणे बाकी आहे. असे एकूण रुपये 1,37,19,087/- वसूल करुन जिल्हा परिषद सेस निधीत जमा होणे आवश्यक आहे.

2) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे पत्र क्रमांक 8256, दिनांक 14/10/2016 रोजी लेखापरिक्षणास सादर केलेल्या पत्रावरुन दिनांक 19/11/2014 पासुन ते आजपावेतो जिल्हा परिषद मुद्रणालय (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांचे आदेश क्रमांक 8903, दिनांक 19/11/2014 अन्वये) बंद असल्याचे नमुद आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचे उत्पन्न बंद झालेले असुन लाखो रुपये किंमतीच्या मशीन (यंत्रे) खराब होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत आवश्यक उपयोजना करण्याची कार्यवाही करावी.

### 3.31 नविन वाहन खरेदीबाबत.

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 11,71,243/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 2 पी ii/1008/455/ प्र.क्र.54/परा-1, दिनांक 17/04/2009 व शासन निर्णय क्रमांक झेडपी1099/प्र.क्र.128/99/05, दिनांक 09/07/1999 नुसार जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष सर्व विषय समित्यांचे सभापती, मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरीक्त कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांचे करीता जिल्हा परिषद घसारा निधीतून वाहन खरेदी करण्यात अनुमती दिलेली असून या व्यतिरिक्त सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग यांचेकरीता त्या त्या मंत्रालयीन विभागांनी वाहन खरेदी करणे आवश्यक राहील. कार्यकारी अभीयंता बांधकाम यांना वाहन पुरविण्याची वैधानिक जवाबदारी ग्रामविकास विभागाची नसल्याने त्यांना वाहने देऊन नविन वाहन खरेदी करण्यात आले आहे.

2) दिनांक 21/08/2014 चे टिपणीनुसार वाहन क्रमांक एम एच 30 एच 48 वाहन निर्लेखीत करण्यास सर्वसाधारण सभा दिनांक 22/08/2014 ठराव क्रमांक 04 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. परंतु, सामान्य प्रशासन विभागाला 11 वाहन मंजुर असून 11 वाहन कार्यरत आहेत. असे असतांना नविन वाहन खरेदी करता येणार नाही. तरी सुध्दा नविन वाहन खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

3) राज्यस्तरीय वाहन आढावा समितीची मंजुरात घेण्यात आली नाही. (विभागीय आयुक्त यांचे पत्रामधील अट क्रमांक 4 नुसार)

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परीपत्रक क्रमांक वाहन-2013/प्र.क्र.31/13/विनिमय, दिनांक 20/09/2013 मधील परीच्छेद क्रमांक 3 नुसार निर्लेखीत वाहनांच्या बदली नविन वाहने खरेदी केल्यानंतर दोन महिन्यांच्या आत निर्लेखीत वाहनाची विक्री करणे बंधनकारक राहील. तसेच अट क्रमांक 2 नुसार निर्लेखीत करावयाच्या वाहनाच्या लिलावामुळे प्राप्त होणारी रक्कम घसारा निधीमध्ये जमा करण्यात यावी. त्यानंतरच नविन वाहन खरेदी करावे. सदर दोन्ही वाहने अद्यापही निर्लेखीत झालेली नाहीत. त्यामुळे नविन वाहन खरेदीस मंजुरी देतांना विभागीय आयुक्तांचे अटी व शर्तीचे पालन जिल्हा परीषदेने केलेले नाही.

### 3.32 छत्रपती शाहू सभागृहाकरीता सी सी कॅमेरे संच खरेदीबाबत.

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रूपये 2,05,925/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) साहित्य खरेदीची आवश्यकता पहाता खरेदीसंबंधी दिनांक 18/02/2016 ला मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेऊन दरपत्रके मागविण्यात आली. उपमुख्यकार्यकारी अधिकारी दरपत्रक सुचना क्रमांक 296, दिनांक 18/02/2016 नुसार नोटीसबोर्डवर लावण्यात आली. विहीत मुदतीत तीन दरपत्रके प्राप्त झालीत.

तीन दरपत्रके पाहता नाशिक व जालना पुरवठादारास दरपत्रके भरण्यासबंधी सुचना कशा प्राप्त झाल्या? याबाबत खुलासा करावा.

2) दरपत्रके आवकमधून घेण्यात आली नाहीत.

3) पुरवठादारासोबत दुरुस्तीबाबत करारपत्र केल्याचे आढळले नाही. तसेच साहित्याची वॉरंटी / गॅरंटी / अभिलेखे आढळले नाही.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस/2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 चे अनुक्रमांक 11 नुसार वित्त विभागाकडून देयकच्या रक्कमा 15 मार्चनंतर मंजुर करण्यात येणार नसल्याने प्रत्येक खरेदीदार विभागाने आवश्यक त्या वस्तुची खरेदी वित्तीय वर्षाच्या 15 फेब्रुवारी पुर्वीच होईल, अशाप्रकारे खरेदी राबवावी. परंतु, सदर साहित्याची खरेदी नस्ती पाहता खरेदी प्रस्तावच दिनांक 18/02/2016 पासून सुरवात केली. त्यामुळे शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे.

5) दिनांक 29/02/2016 दर मंजुरीबाबत वित्त विभागाकडे नस्ती सादर केली असता, दरास मंजुरी न देता सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्यास सुचित केले. त्या अनुषंगाने दिनांक 03/03/2016 ला मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. परंतु, नस्तीवर पुढे दर मंजुरीबाबत अथवा देयक मंजुरीबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे अभिप्राय नाहीत.

6) दरपत्रक स्पेक्ट्रम इलेक्ट्रानिक्स, सिध्दिविनायक नगर, औरंगाबाद रोड, जालना यांचे असतांना देयकावर स्पेक्ट्रम इलेक्ट्रानिक्स, नागपूर कसे? खुलासा करावा.

7) तोशीबा कंपनीची एल इ डी स्क्रीन 32 इंच रुपये 37,500/- व इतर कॅमेरे खरेदी केले असून सदर दर बाजार भावाशी तुलना केल्याचे आढळत नाही. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस/2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 नुसार खरेदी करण्यापूर्वी उपलब्ध उत्पादनाची माहीती घेऊन बाजारातील सदर वस्तूचे दर काय आहेत? कुठल्याही परिस्थितीत वस्तूचे दर किरकोळ विक्रीपेक्षा जादा आहेत काय? याची पडताळणी करणे आवश्यक असताना तसे केल्याचे आढळत नाही.

8) जगंम मालमत्ता नोंदवहीची तपासणी केली असता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती नियम 98(1) व (2) नुसार जंगम मालमत्ताच्या नोंदी विभाग प्रमुखांनी दरवर्षी पडताळणी करून निष्पत्ती प्रमाणपत्र नोंदवणे आवश्यक असतांना नोंदविले नाही.

**3.33 अध्यक्षीय कार्यालयाकरीता फर्निचर खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 2,69,650/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दोन्ही खरेदी नस्ती पाहता दरपत्रके मागवून खरेदी करण्यात आलेली आहे. दोन्ही खरेदी प्रकरणात तीन दरपत्रके प्राप्त असून दरपत्रके सादर करणारे पुरवठादार एकच आहेत. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभागातील शासन निर्णय क्रमांक भाखस/2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 नुसार मोठे आदेश लहान लहान आदेशामध्ये विभागणी करून दरपत्रके मागविण्यात येऊ नये. परंतू, विभागाने खरेदीचे विकेंद्रीकरण केल्याचे आढळते.

2) प्रशासकीय मंजूरी व दरपत्रक सुचना पाहता एकाच वेळी दोन्ही साहित्य खरेदी प्रकरणी दरपत्रके मागविता आली असती. परंतू, विभागाने एका दिवसाचे अंतर ठेऊन वेगवेगळी दरपत्रके मागविणेबाबत खुलासा करावा.

3) क्रमांक 2 च्या खरेदी प्रकरणी प्राप्त दरपत्रके तुलनात्मक तक्ता तयार करून दिनांक 10/02/2016 ला वित्त विभागामार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दर मंजूरीबाबत सादर केल्याबाबत नस्तीवर नोंद आहे. परंतू, वित्त विभागाचे अभिप्राय नाहीत.

4) शासन निर्णय दिनांक 30/10/2015 नुसार आलेल्या दरपत्रकातून कमी दर असलेल्या रौनक उद्योगाला पूरवठा आदेश देण्यापूर्वी बाजारपेठेचे सर्वेक्षण केले नाही. त्यामुळे किंमतीचा आधार, अंदाज व वाजवीपणा व बाजार

भावानुसार इष्टतम स्पर्धा, पारदर्शकता इत्यादीचा वापर केल्याचे आढळत नाही. अध्यक्ष कक्षामध्ये संपूर्ण नविन फर्निचर खरेदी केले असून, जुन्या फर्निचरचे काय केले? याबाबत खुलासा झाला नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 90 अन्वये साहित्य सुस्थितीत प्राप्त झाल्याबाबत सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र साठा नोंदवहीवर नमुद नाही. तसेच साहित्य मिळाल्याचा चलान क्रमांक व दिनांक नमुद नाही. दिनांक 09/02/2016 चे डिलेव्हरी चलान नस्तीसह आढळले असून, त्यावर 19 नग छोटया खुर्च्या व 2 नग मोठया खुर्च्या नोंदविलेले असून 21 चेअर व ऑफीस टेबल याचे डिलेव्हरी चलान आढळले नाही. त्यामुळे साहित्य वेळेत प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही.

6) उपरोक्त शासन निर्णय दिनांक 30/10/2015 चे 2.9.3 नुसार जिल्हा स्तरावर खरेदी समिती स्थापन करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केल्याचे आढळत नाही.

### 3.34 ग्रामपंचायतींनी खर्चाचे अभिलेखे लेखापरीक्षणात तपासणीस उपलब्ध न केल्याबाबत.

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद वाशिमचे सन 2015-2016 सामान्य प्रशासन विभागाचे लेखापरीक्षण केले असता पंचायत विभागाकडून प्राप्त झालेल्या विवरणपत्र नुसार सन 2007-2008 ते 2014-2015 पर्यंत एकून 53 ग्रामपंचायतींचे 159 घटकांचे खर्चाचे अभिलेखे लेखापरीक्षणात तपासणीस उपलब्ध् केले नाहीत. त्यामुळे त्यांचे नियमित लेखापरीक्षण प्रलंबित आहे.

2) मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 मध्ये (सुधारणा 2011 मधील कलम 8) नुसार जी कोणतीही व्यक्ती कलम 6, पोट कलम (1) खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वेय कायदेशीररित्या तिला कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात दुर्लक्ष करेल किंवा तिचे अनुपालन करण्याचे नाकारेल, ती दानाधीकार्याकडे शिद्धापाराध ठरविण्यात आल्यानंतर 25,000/- रुपयापर्यंत असू शकेल, इतक्या दंडास पात्र होईल, अशी तरतूद आहे. ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक लेखाप -201/प्र.क्र.81/वित्त-5, दिनांक 18/02/2014 नुसार विहित मुदतीत अभिलेखे उपलब्ध न झाल्यास स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय वाशीम ने पत्र क्रमांक 234, दिनांक 31/03/2016, पत्र क्रमांक 273, दिनांक 16/04/2016, पत्र क्रमांक 1156, दिनांक 10/11/2016 नुसार दंडात्मक कार्यवाहीचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे सादर केला आहे. उपरोक्त अधिनियामान्वे कार्यवाही होणे आवश्यक आहे

### 3.35 जिल्हा परिषद इमारत सफाई करीता दिलेल्या कंत्राट मधील अनियमितता.

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 2,53,043/-खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-2015 मध्ये सफाई कंत्राट मॉ.जिजाऊ स्वयंरोजगार संस्था पार्डी यांना असतांना त्यांचा कंत्राट कालावधी दिनांक 31/01/2015 रोजी संपुष्टात आलेला असल्यामुळे सन 2015-2016 करीता सफाई कंत्राट देणेकरीता विभागाने कुठलीही निवीदा प्रक्रिया राबविली नसल्याचे नस्तीहु न निदर्शनास येते. महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8 अ नुसार निविदा प्रक्रिया करणेकरिता जाहीर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन कंत्राटाव्दारे दोन लिफाफा पध्दतीव्दारे दर मागणी करून त्यानुसार कामाचे मुल्य निश्चित करुन कंत्राटाचा वार्षिक करार करुन निविदेतील अटी व शर्तीनुसार कामे देणे बंधनकारक ठरते. परंतू, विभागाने तशा प्रकारची कार्यवाही केली नाही. उपरोक्त नियम व शासन निर्देशाचा भंग केला आहे. तसेच महाराष्ट्र शासन, रोजगार व स्वयंरोजगार, शासन निर्णय क्रमांक इएसई 2003/प्र.क्र-191/रोसरो-1, दिनांक 01/02/2006 नुसार 5 लाखापर्यंतची कामे विना निविदा बेरोजगार सेवा सोसायट्यांना तसेच लोकसेवा केंद्रांना देणे आवश्यक असतांना याप्रमाणे काम वाटप समितीकडे याप्रमाणे बरोजगार सेवा सोसायट्यांच्या यादी मागितलेल्या नाहीत. जिल्हा लिपीक वर्गीय संघटना यांचे हितसंबंध जोपासत सदर संस्थेला जिल्हा परिषद इमारतीचा सफाई कंत्राट दिलेला आहे.

2) सफाई कंत्राट नस्तीची तपासणी केली असता यापुर्वीचा मॉ. जिजाऊ स्वयंरोजगार संस्थेचा कंत्राट संपुष्टात आल्याने व त्याबाबत अनेक तक्रारी असल्याकारणाने जिल्हा परिषद लिपीक वर्गीय कर्मचारी संघटना यांनी सदर सफाई काम वार्षिक किंमत रुपये 275000/- मध्ये करण्यास तयार असल्याबाबत दिनांक 14/07/2014 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र दिलेले आहे. जिल्हा परिषद लिपीक वर्गीय कर्मचारी संघटना यांचे पत्र दिनांक 14/07/2014 अन्वये रुपये वार्षिक रुपये 2,75,000/- मध्ये काम करण्यास संमती दर्शवली असतांना व यापेक्षा जादा दर वाढवुन मिळणेबाबत कुठलेही मागणी पत्र नसतांना नस्तीमध्ये टीप्पणीवर मासिक रुपये 37,000/- प्रती माह प्रमाणे संघटनेस काम करण्यास मंजुरी घेतलेली आहे. जिल्हा परिषद कर्मचारी संघटना कमी दरात काम करण्यास तयार असतांना त्यांची जादा दराबाबत मागणी नसतांना त्यांना जादा दराने काम देण्यामुळे उपकर निधीचे नुकसान झालेले आहे. जादा दर मंजुर करण्याचे प्रयोजन काय? याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 18 दिनांक 29/09/2016 अन्वये खुलासा मागीतला असता कुठलेही उत्तर/खुलासा लेखापरीक्षणास उपलब्ध झालेला नाही.

3) सदर संस्थेस काम करणे बाबतचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश पत्र नस्तीमध्ये नाही.

4) संस्थेसोबत करारनामा केलेला नाही.

5) खर्चास प्रशासकीय मंजुरी मुख्य कार्यकारी अधिकरी यांची घेतलेली नाही. सन 2015-2016 मध्ये सदर बाबीकरीता अंदाजपत्रकात स्वतंत्र तरतुद केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमातील कलम 125 नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजूरी प्राप्त करणे आवश्यक आहे. परंतू, तशा प्रकारची कार्यवाही न करता जिल्हा परिषद स्वःउत्पन्नातून स्वतंत्र बाब मुळ व सुधारीत तरतूद न करता सादील तरतूद मधुन विनामंजूरी खर्च करुन उपरोक्त शासन नियम व अधिनियमाचा भंग केला आहे

6) संघटनेकडुन किती मजुर कामवर लावण्यात आलेत व त्यांची नावे यांची यादी नाही.

7) मजुर नियमीत काम करीत असल्याबाबत त्यांची दैनंदिन निरीक्षण अहवाल/ नोंदवही लेखापरीक्षणास उपलबध झालेली नाही.

8) मजुरांचे हजेरी पत्रक दैनंदीन सफाईबाबत कुठलीही निरीक्षण न ठेवता संपुर्ण महिन्याचे देयक अदा केलेले आहे.

**3.36 ग्रामपंचायतीकडील प्रलंबित अफरातफर प्रकरणाबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिष्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-2015 चे लेखापरीक्षण अहवालानुसार मार्च 2015 अखेर गुंतलेली प्रकरणे 563 रक्कम रूपये 8,65,46,514/- दाखविण्यात आलेली आहे. मात्र सन 2015-16 सुरुवातीची शिल्लक 508 रक्कम रूपये 6,64,75,969/- याप्रमाणे कमी दाखविलेली आहे. याप्रमाणे रक्कम रूपये 2,00,70,545/- ची तफावत आहे. तफावती बाबत खुलासा करावा. अफरातफर प्रकरण नोंदवही विभागाने ठेवलेली नसल्यामुळे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली आकडेवारी बरोबर असल्याची पडताळणी करता येत नाही.

2) उपरोक्त विवरणानुसार अफरातफर प्रकारणे मोठया प्रमाणात रक्कमा गुंतून पडून आहे. त्यामुळे शासन निधीचे व ग्राम निधीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. एवढ्या मोठ्या रक्कमेपासुन ग्रामपंचायत वंचीत राहत असुन सदर रक्कमेअभावी त्यांची विकास कामे करता येत नसल्याने त्यापासुन त्या त्या गावातील जनता योजना/कामांच्या लाभापासुन वंचीत राहत आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक डीईएन /2006/ प्र.क्र.771/ आस्था-12 दिनांक 28 सप्टेंबर 2006 अन्वये अपहाराची जबाबदारी निश्चित करुन सामान्य निधी / पाणी पुरवठा निधी / योजनानिहाय रककम वसुल करुन योग्य शासन लेखाशिर्ष निहाय जमा करण्याबाबत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 38 (5),57 (3) फ व 139 अन्वये जबाबदारी निश्चित करण्यात येते त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. करीता दिवसेदिवस प्रकरणांची संख्या वाढतच जात आहे.

4) प्रकरणांशी संबंधीत बरेचसे कर्मचारी शासकीय सेवेत कार्यरत असुन त्यांचे वेतन व भत्ते नियमीतपणे अदा करण्यात येत आहेत. परंतु, त्यांचेकडील वसुलीसाठी कोणतीही ठोस कार्यवाही, प्रयत्न केल्या जात नाही.

संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन वेतनातुन सहज वसुली केल्या जावू शकते. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत नाही. ग्रामसेवकांना निवृत्तीचे वेळेस कोणतेही अहवाल व वसूली न पाहता विस्तार अधिकारी व गट विकास अधिकारी यांचेकडून नाहरकत प्रमाणपत्र दिले जातात. तेव्हा शासनाचे रक्कमा अदयाप वसूल केल्या नाहीत. संबंधीत बाबीकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करण्यात येत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. वसुली होत नसल्याने संबंधीतांना त्याचे गांभीर्य कळत नाही व याप्रमाणे अफरातफर प्रकरणांच्या संख्येमध्ये वाढच होत आहे ही बाब योग्य नाही.

5) सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांची प्रलंबित परिच्छेद निकाली तथा निपटारा करणेबाबत उदासिनता दिसून येते. तरी याबाबत जिल्हा परिषद सेवा (वर्तणुक) नियम 1964 चे नियम 3 कर्तव्यात कसूर केल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (शिस्त व अपील ) नियम 1964 चे नियम 4 भाग तीन अन्वये नियम 5 नुसार शिस्तविषयक प्राधिकरणाने कार्यवाही करणे आवश्यक ठरते. परंतु, तशा प्रकारची कार्यवाही विभागाने केली नाही.

6) ग्रामपंचायतीचे अफरातफर प्रकरणाबाबत जिल्हा परिषद स्तरावरुन कार्यवाही करण्यात येते. याबाबत स्थानिक निधी लेखा विभागाला कळविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कळविण्यात येत नाही. करीता पंचायत समिती कडील माहिती अन्वये अफरातफर प्रकरणे व त्यात गुंतलेली रक्कम यांची आकडेवारी व स्थानिक निधी लेखा विभागाकडील आकडेवारी यांचा ताळमेळ बसत नाही.

प्राधिकरणाने कोणतीही कार्यवाही न केल्याने अफरातफर प्रकरणे व गुंतलेली रक्कम वाढत आहे. तसेच सबंधीताकडील अफरातफर केलेल्या रक्कमेची वसुली होत नसल्याने जिल्हा परिषदेचे आर्थीक नुकसान होत आहे. याकडे विशेष लक्ष पुरवून अफरातफर प्रकारणांचे अनुपालन कार्यवाही व सबंधीताकडून रक्कमेची वसुली करण्यात यावे. उपरोक्त प्रकरणाबाबत जबाबदारी निश्चित करुन उपरोक्त रकमा शासनखाती त्या त्या लेखाशिर्षात भरणा करण्यात याव्या.

### 3.37 जिल्हा परिषद उपकर निधीतुन स्टेशनरी व इतर साहित्य खरेदीतील अनियमिततांबाबत.

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,27,529/-खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सभापती टेबल ग्लास, फायबर मग्गा, ॲल्युमिनीयम सिडी या साहित्याची साठा पुस्तकात नोंद घेतलेली नसल्यामुळे सदर साहित्य प्रत्यक्षात खरेदी केलेली असल्याबाबत खात्री करता आलेली नाही. त्यामुळे सदर खरेदीची रक्कम रुपये 21,020/- लेखापरीक्षणात वसुलपात्र ठरविण्यात येत आहे.

2) महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस.1088/(2512)/ उदयोग-6, दिनांक 02/01/1992 मधील तरतुदीनुसार रुपये 1,000/- वरील साहित्याची खरेदी दरपत्रके मागवुन करणे आवश्यक असतांना वरील साहित्याची खरेदी करतांना विहीत कार्यपध्दतीचा अवलंब केला नाही.

3) महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस.1093/(2635)/ उदयोग-6, दिनांक 16/07/1993 मधील परिच्छेद क्रमांक (2) नुसार एका वेळी एखादया दरकराराव्यतिरिक्त वस्तूची खरेदी रुपये 1,000/- किंवा त्यापेक्षा जास्त असेल किंवा वार्षिक खरेदी रुपये 50,000/- पेक्षा कमी असेल, अशावेळी मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या वैध नोंदणीकृत पुरवठादाराकडून दरपत्रक मागवून प्रचलित नियमानुसार खरेदी करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केली नाही.

4) उपरोक्त खरेदीबाबत खरेदी नस्ती उपलब्ध झालेली नाही . त्यामुळे -

i) खरेदीची आवश्यकता ii)संबंधीताचे मागणीपत्र iii) सदर खर्चास व खरेदीस प्रशासकीय मंजुरी, iv) दरपत्रके v) पुरवठा आदेश आदी कुठलाही अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे आवश्यकतेनुसार आवश्यक त्या मंजुरीसह खरेदी प्रक्रिया राबविलेली असल्याबाबत खात्री करता आलेली नाही. सबब विहीत पद्धतीने खरेदी प्रक्रीया राबविलेली नाही. नियमबाह्यपणे खरेदी केलेली आहे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83 मधील तरतुदीनुसार विभागाने कार्यवाही करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केली नाही.

6) महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, शासन निर्णय क्रमांक सपस 1010/प्र.क्र.16/24स, दिनांक 30/08/2010 मधील तरतुदीनुसार राज्यातील सर्व शासकीय निमशासकीय कार्यालये यांना त्यांच्या दैनंदिन कामाकाजाकरीता कार्यालयीन स्टेशनरी, उपकरणे, तसेच नित्योपयोगी वस्तु या वस्तुंची खरेदी दि. महाराष्ट्र स्टेट को- ऑपरेटिव्ह कंझ्युमर्स फेडरेशन लि. यांचेकडून प्राधान्याने करणे आवश्यक असतांना त्यानुसार विभागाने कार्यवाही केली नाही.

7) साहित्याची नोंद साठा पुस्तकात घेतल्यानंतर कुठल्याच साहित्यावर उपमुख्य कार्यकरी अधिकारी (सा) यांच्या स्वाक्षरी नाहीत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 91 मधील तरतुदी नुसार खरेदी केलेल्या साहित्याच्या नोंदी विहीत नमुना 33 मध्ये घेऊन कार्यालय प्रमुखाचे स्वाक्षरीने साक्षांकीत करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही. त्यामुळे साहितय प्रत्यक्षात खरेदी करुन सुस्थितीत प्राप्त झालेले असल्याबाबत खात्री करता आलेली नाही.

8) साहित्याचे वितरण दाखविलेले नाही. त्यामुळे साहित्य उपयोगात आणले अथवा विनावापर पडुन आहे. याबाबत खात्री करता आलेली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 79 मधील तरतुदी नुसार खरेदी केलेल्या साहित्याचे पैसे प्रत्यक्ष देण्यांत आल्यानंतर पुरवठा बिले दुसऱ्यांदा अनावधानाने किंवा अन्यथा वापरली जाऊ शकणार नाही, अशा तऱ्हेने विरुप करणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही केली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 79 मधील तरतुदी नुसार खरेदी केलेल्या साहित्याचे पुरवठयाच्या बाबतीत पुरवठा घेणाऱ्या अधिकाऱ्याने पैसे देण्यापुर्वी सामान, वस्तू वगैरे चांगल्या स्थितीत मिळाल्याचे आणि त्यांची योग्य त्या संग्रह नोंदवहीत नोंद घेतल्याचे प्रमाणपत्र नोंदणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

**3.38 जिल्हा परीषद उपकर निधीतुन अधिकारी पदाधिकारी तसेच कार्यालयीन फर्निचर खरेदीतील अनियमीतता.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदर बाबत रक्कम रूपये 3,03,930/-खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदने उपरोक्त साहित्य खरेदीसाठी एकत्रीतपणे अधिकृत पुरवठादाराकडून दरपत्रकाची मागणी करून साहित्याची खरेदी करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही न करता तुकडे पध्दतीने साहित्याची खरेदी केली आहे. महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस .1088/(2512)/ उदयोग-6, दिनांक 02/01/1992 मधील तरतुदीनुसार वरील साहित्याची खरेदी करतांना विहीत कार्यपध्दतीचा अवलंब केला नाही. शासन निर्णयातील तरतुदीचे पालन केले नाही. शासन निर्णयानुसार रुपये रुपये 50,000/- वरील साहित्य खरेदी ही वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निवीदा मागवुन करणे आवश्यक असतांना रुपये 50,000/- च्या आतील देयके घेऊन तसेच तुकडे पाडुन साहित्य खरेदी करून निवदा प्रक्रिया हेतुपुरस्सर टाळलेली आहे.

2) महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस 2002/(2990)/ उदयोग-6, दिनांक 04/02/2003 नुसार जिल्हा परिषदेला वस्तू खरेदी बाबत शासनाने दिनांक 02/01/1992 च्या शासन निर्णयान्वये आणि वेळोवेळी विहीत केलेली कार्यपध्दती बंधनकारक केली आहे. परंतु, उपरोक्त साहित्याची खरेदी करतांना विभागाने शासन निर्णयातील तरतुदीचे पालन व विहीत कार्यपध्दतीचा अवलंब केला नाही. शासन निर्णय दिनांक 02/01/1992 नुसार फर्निचर खरेदी ही महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ (MSSIDC) यांचे कडुन करणे आवश्यक असतांना साहित्य खरेदी करण्यापुर्वी दरपत्रके बोलविण्यापुर्वी एमएसएसआयडीसी यांचेशी साहित्य मागणी बाबत पत्रव्यवहार केलेला नाही. दराबाबत एमएसएसआयडीसी कडे खात्री केलेली नाही. तसेच कापडी पडदे व कारपेट खरेदी ही हातमाग महामंडळकडुन करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता स्थानिक बाजारपेठेतुन दरपत्रके बोलवुन साहित्य खरेदी केलेले आहे. सबब खरेदी प्रक्रीया विहीत नियमानुसार पार पाडलेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 83 मध्ये नमुद केल्यानुसार कार्यालयीन साहित्य खरेदीची किंमत एकत्रीत 5 हजारांपेक्षा जास्त असेल, तेंव्हा अशा वस्तु राज्य व केंद्र शासनाच्या अथवा पुरस्कृत एखाद्या विभागाकडुन संस्थेकडुन अथवा संघटनेकडुन किंवा औद्योगिक सहकारी संस्थेकडुन पुरस्कृत संस्थेकडुन करणे आवश्यक आहे. लेखन सामग्री खरेदी संचालक, शासकीय मुद्रणालय व लेखन सामग्री, मुंबई यांचेकडे मागणीपत्र पाठवुन खरेदी करणे बंधनकारक असतांना याप्रमाणे खरेदी करण्यापुर्वी कार्यवाही केल्याचा अभिलेख मागणीपत्र नस्तीमध्ये नाही. सबब विभागाने नियम 83 प्रमाणे कुठलीही कार्यवाही न करता स्थानिक बाजारपेठेतुन दरपत्रकेमागवुन खरेदी केलेली आहे. सदरची बाब नियामबाह्य आहे.

4) दिनांक 30/10/2015 नंतरची खरेदी ही महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क.82/ भाग-III/उद्योग -4, दिनांक 30/10/2015 मध्ये नमुद सुधारीत कार्यपद्धती नुसार करणे आवश्यक आहे. नियमपुस्तीकेच्या परीच्छेद 2.9.2 मध्ये नमुद केल्यानुसार खरेदी प्रक्रिया पार पाडण्यापुर्वी प्रशासकीय विभाग व कार्यालयाअंतर्गत तात्काळ खरेदी समिती गठीत करणे आवश्यक असतांना विभागाने याप्रमाणे खरेदी समिती गठीत न करताच साहित्य खरेदी केलेले आहे.

5) शासन निर्णय दिनांक 30/10/2015 मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार दरपत्रके प्राप्त झाल्यानंतर देखील साहित्याचे दराबाबत बाजारपेठेत खात्री करणे आवश्यक आहे. मात्र याप्रमाणे खात्री करुनच खरेदी करीत असल्याचा उल्लेख संबंधीत खरेदी नस्ती मध्ये नाही.

6) प्रमाणक क्रमांक 121 दिनांक 24/07/2015 अन्वये अध्यक्ष यांचे कक्षाकरीता ए.सी. खरेदी केलेली आहे. संबंधीत नस्तीची तपासणी केली असता नस्तीमध्ये खरेदीस केवळ अध्यक्ष यांचे मागणी पत्र तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी आदेश क्रमांक 4531/ 8/6/15 आहे. यापुर्वीचा ए.सी. नादुरुस्त असल्याचा बांधकाम विभाग विद्युत शाखा यांचा अहवाल नाही. दरपत्रके मागविलेली नाहीत. प्राप्त दरपत्रके पुरवठा आदेश Installation अहवाल आदी कुठलाही अभिलेख नाही. दरपत्रके न मागविता साहित्य खरेदी केलेले आहे. त्यामुळे खरेदी योग्य दरानुसार व आवश्यक त्या गुणवत्तेनुसार झाल्याची खात्री पटत नाही. साठा पुस्तकात उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) यांच्या स्वाक्षरी नाही. अध्यक्ष यांचे कक्षात ए.सी लावण्यात आल्याबाबत अध्यक्ष यांची पोच साठा पुस्तकात घेतलेली नाही.

7) प्रमाणक क्रमांक 312 दिनांक 19/10/2015 अन्वये सभापती समाजकल्याण यांचे कार्यालयाकरीता कारपेट खरेदी केलेली आहे. नस्तीची तपासणी केली असता दरपत्रके सादर करणेबाबत पत्र आहे. मात्र दरपत्रके कोणाकडुन मागविली आहेत, त्या पुरवठादारांची नावे नाहीत संबंधीतास दरपत्रके प्राप्त झाल्याबाबत पोच नाही. दरपत्रके नाहीत केवळ दरांचा तुलनात्मक तक्ता लावलेला आहे. दरपत्रके प्राप्त झालेली नसतांना तुलनात्मक तक्तामध्ये दर कोठुन नमुद करण्यात आलेत? याबाबत माहिती उपलब्ध झालेली नाही.

8) बील क्रमांक 180 दिनांक 13/10/15 वर कारपेटची नोंद नमुना 33 पान क्रमांक 10 वर नोंद घेतल्याचे प्रमाणित केलेले आहे. मात्र लेखापरीक्षणास उपलब्ध साठा पुस्तकावर साहित्य प्राप्त म्हणुन नोंद नाही. साठा पुस्तकात नोंद नसल्यामुळे साहित्य खरेदी करुन प्रत्यक्षात विभागास कारपेट प्राप्त झाल्याबाबत खात्री करता आलेली नाही. सदर खर्च लेखापरीक्षणात अमान्य करण्यात येत आहे.

9) प्रमाणक क्रमांक 313, दिनांक 19/10/15 अन्वये वसंतराव नाईक सभागृहास विद्युत दुरुस्ती बाबत खर्च केलेला आहे. मात्र सभागृहात कुठल्याप्रकारची दुरुस्तीची आवश्यकता आहे. याबाबत सक्षम अधिकारी बांधकाम यांचा तपासणी अहवाल नाही. नस्तीमध्ये दरपत्रके मागविलेली नाहीत. प्राप्त दरपत्रके दुरुस्ती आदेश आदी कुठलाही अभिलेख नाही. दरपत्रके न मागविता दुरुस्ती काम केलेले आहे. त्यामुळे काम योग्य दरानुसार व आवश्यक त्या गुणवत्तेनुसार झाल्याची खात्री पटत नाही. लावण्यात आलेल्या साहित्याच्या नोंदी साठा पुस्तकात घेतलेल्या नाहीत.

10) प्रमाणक क्रमांक 783 दिनांक 31/03/2016 अन्वये वसंतराव नाईक सभागृहासाठी कापडी पडदे खरेदी केलेले आहे. मात्र खर्चास मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी घेतलेली नाही. खर्चास मंजुरी आदेशावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. खरेदीस मंजुरी न घेता खरेदी केलेली आहे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांचे पत्र क्रमांक 8630 दिनांक 23/12/2015 अन्वये दरवाजे व खिडक्यांना पडदे लावणेसाठी मापे घेवुन

अंदाजपत्रक सादर करणेबाबत नमुद केलेले आहे. मात्र याप्रमाणे अंदाजपत्रक घेतलेले नाही. पडदे खरेदीसाठी कापड खरेदीचे प्रमाणक नस्तीमध्ये नाही. कामाचे आदेश नाहीत. आवश्यक ती संपुर्ण कागदपत्रे नस्तीमध्ये नाहीत.

11) प्रमाणक क्रमांक 996 दिनांक 31/3/2016 अन्वये कार्यालयाकरीता संगणक टेबल एअर कंडीशनर तसेच व्हीजीटर चेअर खरेदी केलेल्या आहेत. तसेच निवासस्थानाकरीता बॅटरी + इनव्हेटर तसेच फायबर चेअर खरेदी केलेल्या आहेत. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक एसीडी 1099/ प्र.क्र.214/05, दिनांक 25/10/1999 चे शासननिर्णयासोबतचे जोडपत्र ए मधील यादीनुसार जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाचे निवासस्थानी बॅटरी + इनव्हेटर पुरवविणेबाबत तरतुद नाही. अध्यक्षांचे निवासस्थानी बॅटरी + इनव्हेटर पुरविणे अनुज्ञेय नसतांना याकरीता जिल्हा परिषद उपकरातुन केलेला खर्च रुपये 43,100/- लेखापरीक्षणात वसुलपात्र ठरविण्यात येत आहे. तसेच अध्यक्ष यांचे निवासस्थानी 6 लाकडी खुर्ची पुरविणेची तरतुद आहे. मात्र विभागाने 20 फायबर चेअर पुरविल्या आहेत. अनुज्ञेय नसतांना पुरविण्यात आलेल्या जादा 14 खुर्च्यांची किंमत लेखापरीक्षणात वसुल पात्र ठरविण्यात येत आहे. 14 * 825 = 14025

12) अध्यक्ष निवासस्थानी असलेल्या यापुर्वीच्या साहित्याची काय झाले? याबाबत नोंद नाही. माजी अध्यक्षांकडुन साहित्य परत मिळाल्याची नोंद नाही. शासन निर्णय दिनांक 25/10/1999 मधील तरतुदीनुसार पदाधिकाऱ्यांनी स्वत:च्या सही शिक्यानिशी फर्निचर मिळाल्याची पोच दयावी व पदाधिकाऱ्याचा पदावधी समाप्त होताच त्यांना देण्यात आलेले फर्निचर नोंदीप्रमाणे तपासुन ते जिल्हा परिषदेच्या ताब्यात घेणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केली नाही. फर्निचरच्या नोंदी तसेच फर्निचर पदाधिकाऱ्याकडून परत घेण्याची व त्यांच्या नोंदी करण्याची जबाबदारी जिल्हा परिषद स्तरावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांची असतांना याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही. पुर्वीचे पदाधिकारी यांचे निवासस्थानी पुरवठा केलेल्या साहित्याची यादी अर्धसमास पत्र क्रमांक 1, दिनांक 09/10/2016 नुसार तसेच वारंवार तोंडी मागणी करुन सुध्दा उपलब्ध् केली नाही. तसेच माजी पदाधिकारी यांना दिलेले साहित्य परत घेतल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणात दर्शविण्यात आले नाहीत. पुर्वीचे फर्निचर निकामी झाल्याशिवाय नविन साहित्याची खरेदी करता येत नसतांना विभागाने त्यानुसार कार्यवाही केली नाही.

13) दरपत्रके प्राप्त झाल्यावर त्यावर केवळ भांडार लिपीकाची स्वाक्षरी आहे. विभाग प्रमुखाची उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांची स्वाक्षरी नाही. मृणाली सर्व्हीसेस व राजेश एन्टरप्राईजेस यांचे दरपत्रक नस्तीमध्ये नाही. साठा पुस्तकावर साहित्य प्राप्त झाल्याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांची स्वाक्षरी नाही. साहित्य सुस्थितीत प्राप्त झाल्याबाबत प्रमाणित केलेले नाही. साहित्य प्राप्त् झाल्याबाबत अध्यक्ष यांची साठा पुस्तकावर पोच नाही. त्यामुळे संबंधितास साहित्य प्राप्त झाल्याबाबत खात्री करता आलेली नाही.

14) प्रमाणक क्रमांक 121, 312, 783 चे पुरवठाधारकाचे देयकातुन आयकर अधिनियम 1964 चे कलम 194 (सी) नुसार आयकराची रक्कम 2 टक्के दराने कपात केलेली नाही. त्यामुळे शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे. आयकर रककम वसुल रुपये 3,638/- करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन सादर करावे.

**3.39 पदाधिकाऱ्यांच्या निवासस्थान व कार्यालया करीता फर्निचर खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत 3 प्रमाणकांन्वये रक्कम रुपये 1,45,651/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदने उपरोक्त साहित्य खरेदीसाठी एकत्रीतपणे अधिकृत पुरवठादाराकडून दरपत्रकाची मागणी करुन साहित्याची खरेदी करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही न करता तुकडे पध्दतीने साहित्याची खरेदी केली आहे. सदर अनियमततेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83 मधील तरतुदीनुसार विभागाने कार्यवाही करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केली नाही.

3) महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/ भाग-3/उद्योग-4 दिनांक 30/10/2015 नुसार वस्तू खरेदी विहीत केलेल्या कार्यपध्दती बंधनकारक करण्यात आली आहे. परंतु, विभागाने वरील खरेदीसाठी विहीत कार्यपध्दतीचा अवलंब केला नाही.

4) महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस.1093/(2635)/ उदयोग-6, दिनांक 16/07/1993 मधील परिच्छेद क्रमांक (2) नुसार एका वेळी एखादया दर कराराव्यतिरिक्त वस्तूची खरेदी रुपये किंवा त्यापेक्षा 1000 जास्त असेल किंवा वार्षिक खरेदी रुपये 50,000/- पेक्षा कमी असेल अशावेळी मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या वैध नोंदणीकृत पुरवठादाराकडून दरपत्रक मागवून प्रचलित नियमानुसार खरेदी करणे आवश्यक होते. परंतु, तशी कार्यवाही न करता विभागाने नियमबाहयपणे स्थानिक ठराविक तीन दुकानदाराकडून दरपत्रक मागणी करुन साहित्याची खरेदी केल्याचे टिपणीत नमूद आहे. परंतु, दर मागणीचे पत्र सबंधीत नस्तीत उपलब्ध झाले नाहीत.

5) वरील शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 3 मधील तरतुदीनुसार दरकराराव्यतिरिक्त वस्तूची खरेदी करतांना एका वस्तूची वार्षिक खरेदी रूपये 5,000/- किंवा त्यापेक्षा अधिक असेल, अशा वेळी राजपत्रात निविदा चौकशी प्रसिध्द करुन निविदा मागविणे बंधनकारक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 25/10/1999 मधील तरतुदीनुसार पदाधिकाऱ्यांनी स्वत:च्या सही शिक्यानिशी फर्निचर मिळाल्याची पोच दयावी व पदाधिकाऱ्याचा पदावधी समाप्त होताच, त्यांना देण्यात आलेले फर्निचर नोंदीप्रमाणे तपासुन ते जिल्हा परिषदेच्या ताब्यात घेणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केली नाही. फर्निचरच्या नोंदी तसेच फर्निचर पदाधिकाऱ्याकडून परत घेण्याची व त्यांच्या नोंदी करण्याची जबाबदारी जिल्हा परिषद स्तरावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांची असतांना याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही. पुर्वीचे पदाधिकारी यांचे निवासस्थानी पुरवठा केलेल्या साहित्याची यादी मागणी करुन सुध्दा उपलब्ध् केली नाही. तसेच माजी पदाधिकारी यांना दिलेले साहित्य परत घेतल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणात दर्शविण्यात आले नाहीत. पुर्वीचे फर्निचर निकामी झाल्याशिवाय नविन साहित्याची खरेदी करता येत नसतांना विभागाने त्यानुसार कार्यवाही केली नाही.

उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता होईपर्यंत झालेला खर्च रुपये 1,45,651/- तात्पुरता अमान्य ठेवण्यात येत आहे.

## 3.40 मुख्य कार्यकारी अधिकरी यांचे निवासस्थानावरील विदयुत बिल शासकीय निधीतून भरणा केलेल्या रक्कमेची वसुलीबाबत.

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सामान्य प्रशासन विभागाने सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणादरम्यान विद्युत देयकांची नोंदवही नमुना 34 मीटर नोंदवही ची तपासणी केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानातील विद्युत देयकांचा भरणा रक्कम रूपये 1,55,495/- शासकीय निधीतुन केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) अधिकारी व कर्मचारी यांना जिल्हा परिषदने पुरविलेल्या निवासस्थानातील स्वत: वापर करत असलेले विदयुत व पाणी यांचे देयके संबंधिताने स्व:उत्पन्नातून भरणा करणे आवश्यक असतांना शासकीय निधीतून खर्च भागविणे अनुज्ञेय ठरत नाही.

2) जिल्हा परिषदेने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुरविलेल्या निवासस्थानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वत: वापर केलेले विदयुत बिलाच्या [ग्राहक क्रमांक 326010172384 ] रक्कमा लेखाशिर्ष 2053-0565 या शासकीय लेख्यातील प्राप्त अनुदानातुन अदा करणेत आला आहे.

3) निवासस्थान विदयुत मीटर नोंदवही महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 92 अन्वये नमुना 34 मध्ये ग्राहक क्रमांक, वापरलेल्या युनिट संख्या, मागील, चालू व एकूण रिडींगचे नोंदी संबंधीत भांडार लिपीकाने ठेवणे आवश्यक आहे व सदरच्या नोंदी कार्यालय प्रमुख यांनी साक्षांकीत करणे आवश्यक आहे. परंतु, नोंदवहीमध्ये केवळ अदा केलेल्या देयकांच्याच नोंदी घेतलेल्या आहेत

4) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानाचे विदयुत बिले शासकीय निधीतून कोणते प्राधिकारान्वये खर्ची टाकण्यात आले? याबाबत सामान्य प्रशासन विभागाने संबंधीतावर आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. सदर विदयुत देयकाची वित्त विभागाने छाननी तथा पडताळणी न करता विदयुत देयके कशी पारीत केले आहे?

**3.41 पंचायत राज संस्थाचे संगंणीकरण करण्याकरीता महाऑनलाईन लि. ला अदा करण्यांत आलेल्या मोबदल्याच्या देयकातून आयकराची कपात कमी करणेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** या वित्तीय वर्षात 13 व्या वित्त आयोगांतर्गत वितरीत निधीतून इ.पी.आर.आय / संग्राम प्रकल्पासाठी महाऑनलाईन तर्फे कंत्राटी पध्दतीने जिल्हा परीषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करुन दिलेल्या तांत्रिक मनुष्यबळ व अनुषंगिक तांत्रिक सेवेबददलच्या मोबदल्याची अदायगी करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचे पत्र क्रंमाक तेविआ 2011/ प्र.क्रं.42/वित्त-4, दिनांक 08/12/2015 नुसार महाऑनलाईन ला प्रदान करण्यांत आलेल्या रक्कमेतून सुरुवातीपासून 10 टक्के प्रमाणे आयकराची वसुली थकबाकीसह करणे बाबत सुचित करण्यांत आले आहे.परंतू या प्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ 2011/ प्र.क्र.42/वित्त-4, दिनांक 01/11/2011 मधील (ड) (4) व (5) नुसार महाऑनलाईन मार्फत कंत्राटी पध्दतीने जिल्हा परीषद / पंचायंत समिती व ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या तांत्रिक मनुष्यंबळाच्या मोबदल्याच्या अदायगीबाबतची तिनही स्तरावरील एकत्रित व एकुण रक्कमेची देयके अदायगीची प्रक्रिया उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचा जिल्हा परीषद स्तरावरील देयकाच्या पडताळणी बाबतचा अहवाल व संबंधीत पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांचा पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील देयकाच्या पडताळणी बाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत 10 टक्के रक्कमेचे प्रदान करणे आवश्यक असतांना त्यानुसार पडताळणीची कार्यवाही न करता रककमेचे शोधन केले आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ 2011/ प्र.क्रं.42/वित्त-4, दिनांक 01/11/2011 मधील परीच्छेद 9 नुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी जिल्हा परीषद / पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर नेमलेले जे मनुष्यबळ आहे, त्या मनुष्यबळाच्या मोबदल्याच्या अदायगीच्या हिशेबासाठी त्यांचे स्तरावर स्वतंत्र नोंदवहया ठेवणे आवश्यक असतांना तशा प्रकारच्या स्वतंत्र नोंदवहया ठेवण्यात आल्याचे आढळून आले नाही. तसेच जिल्हा परिषद स्तरावर असलेल्या मनुष्यबळाचा अहवाल देयकासोबत आढळून आलेला नाही. त्यामुळे जिल्हा परिषद स्तरावरील करण्यांत आलेल्या प्रदानाबाबत लेखापरीक्षणाची खात्री होवू शकली नाही.

**3.42 जिल्हा परिषद स्तरावर पंचायत राज पुर्नविलोकन अहवालात समाविष्ठ लेखा आक्षेपाची नोंदवही ग्रामपंचायत विभागाने ठेवली नसल्यामुळे पंचायत राज पुर्नविलोकन अहवालात समाविष्ठ लेखा आक्षेपासंबधी तथा प्रलंबित लेखाआक्षेपाची माहिती विभागाकडे नसणेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायती राज संस्थेचे व्यापक मुलयामापन करण्याचे काम हाती घेण्यासाठी व पंचायती राज पुर्णविलोकन अहवाल राज्य विधान मंडळास सादर करुन एकत्रीकृत वित्तिय लेख्यामुळे, विधानमंडळाला पंचायती राज संस्थेची वित्तिय स्थिती तसेच गंभीर स्वरुपाच्या बाबी ठळकपणे शासनाच्या निर्देशनास आणून देण्याकरीता सदर अहवालात जिल्हा अंतर्गत लेखापरीक्षण झालेल्या लेखा अहवालातील अनुक्रमांक 1 ते 9 विवरणपत्राच्या आधारे तक्तांकनाद्वारे सदर अहवालात ग्रामपंचायतीचे लेखा आक्षेप समाविष्ट केले जातात. त्याचप्रमाणे स्वतंत्रपने दोन किंवा त्यापेक्षा जास्त लेखा आक्षेप अहवालात समाविष्ट केले जातात. सदरचे समाविष्ट अहवालातील लेखाआक्षेपाची स्वतंत्ररित्या नोंदवही पंचायत विभागाने ठेवून तपशिलवार नोंदी लेखा आक्षेपाला अनुसरुन व लेखा आक्षेपासह

अद्यावत माहीती लेखाआक्षेप वगळल्याच्या आदेश क्रमांकासह असणे अनिवार्य आहे. परंतु ग्रामपंचायत विभागाकडे 1970 पासुन 2016 अखेर पर्यंत 36 वर्षांत अशा प्रकारची नोंदवही ठेवली नाही व कोणते परिच्छेद, कोणत्या ग्रामपंचायतीचे आजपर्यंत अहवालात समाविष्ट झाले याची सुध्दा माहीती संबंधीत विभागास नाही. सदरची बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) हे शासनास प्रलंबित प्रकरणाच्या निपटाऱ्याची माहीती अचूक व योग्य पाठवित नसल्याचे दिसून येते.

2) ग्रामपंचापयतीचे लेखाआक्षेप वगळण्याचे अधिकार जरी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 140 (4) अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना असले तरीही पंचायत राज पुर्नविलोकन अहवालातील समाविष्ट लेखाआक्षेप, आक्षेप वगळण्याचे अधिकार संचालक स्थानिक निधी, महाराष्ट्र राज्य, कार्यालयीन नियमपुस्तिका खंड एक मधिल नियम 737 अन्वये संचालक स्थानिक निधी लेखापरिक्षा मुंबई यांनाच प्रदान करण्यात आल्याने 1970 पासून 2016 अखेरपर्यंत 36 वर्षांत ग्रामपंचायत विभागाकडील पंचायत राज पुर्नविलोकन अहवालात समाविष्ट असलेले लेखा आक्षेपापैकी एकही लेखा आक्षेप संबंधीत विभागाने संचालक, स्थानिक निधी लेखा विभागाकडून वगळून घेतला नाही वा वगळण्यास अनुपालन सादर केले नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक लेखाप 2011/प्र.क्र.18/ वित्त-8, दिनांक 16/03/2011 अन्वये अद्यावत नोंदवह्या लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाचे आदेश आहेत. नोंदवह्याच ठेवल्या नाहीत, शासनाने नियमितपणे शासन निर्णय व परिपत्रकान्वये सक्षम प्राधिकरणास अवगत करुन नोंदवह्या ठेवण्यासंबंधी सुचित करुनही अत्यंत महत्वाच्या व पंचायत राज समितीच्या पुर्णविलोकन अहवालात समाविष्ट प्रलंबित लेखा आक्षेपाची नोंदवही न ठेवणे, अनुपालन न करणे या बाबी निश्चितच गंभीर स्वरुपाच्यावित्तिय अनियमितता वाढीस लागण्याकरीता पुरेशा आहेत.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एयडी 2007/ प्र.क्र.2743/वित्त 8, दिनांक 20/12/2010 च्या शासन परिपत्रकान्वये पंरास प्रलंबित लेखा आक्षेपाची नोंदवही अद्यावत करणे संबधी जबाबदारी निश्चित करण्यास संबंधीत विभाग प्रमुखास अवगत करणे गरजेचे आहे.

### 3.43 अफरातफर प्रकरणात गुंतलेल्या रक्कमांची 100 टक्के वसुली न करणेबाबत व प्रकरणाचे जलदगतीने निपटारा न काढणेबाबत.

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद बुलडाणाचे सन 2015-2016 लेखापरीक्षणाचे वेळी निवडक माहे मधील लेखापरीक्षणात जिल्हा परिषद पंचायत स्तरावर अफरातफर प्रकरणाचा आढावा घेतला असता दिनांक 31/03/2016 रोजीची स्थिती पाहता योजना व सामान्य निधीचे प्रकरणाबाबत नोंदवही ठेवण्यात आली नाही. परंतु विवरणपत्र तपासणीस उपलब्ध झाले त्यानुसार योजनेचे प्रकरणामध्ये रुपये 75,03,404/- व सामान्य निधीचे प्रकरणामध्ये रुपये 4,53,36,385/- एवढ्या रक्कमा गुंतलेल्या आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक 2010/प्र.क्र.135/आस्था-12, दिनांक 28/05/2010 अन्वये पंचायत राज समितीच्या लेखापरीक्षण पुर्नविलोकन अहवालातील नमुद जिल्हा परीषदेच्या ग्रामपंचायत विभागाकडील अपहार प्रकरणाबाबत दिर्घकाळ प्रकरणे प्रलंबीत राहत असल्याने शासकीय रक्कमा मोठया प्रमाणात गुंतुन आढळते.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक लेखा 2007/प्र.क्र.712/ वित्त 4, दिनांक 24/09/2008 अन्वये लेखापरीक्षणामध्ये उपस्थित केलेल्या गैरव्यवहार व अफरातर प्रकरणी ग्रामपंचायतनिहाय स्वतंत्र अभिलेखे तयार करुन संबंधीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वसुलीची कार्यवाही तात्काळ करुन त्याचा त्रैमासीक अहवाल विभागीय आयुक्तांना पाठवावा. परंतु तशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक व्हीपीएम/2010/ प्र.क्र.242/प.रा.3, दिनांक 27/10/2010 नुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत, गटविकास अधिकारी व

विस्तार अधिकारी पंचायत हे सक्षम प्राधीकारी यांनी ग्रामपंचायतीचे प्रलंबीत प्रकरणाची चौकशी करुन वसुली करणेबाबत काटेकोर पालन करावे असे आदेश आहेत. परंतु वसुलीची स्थिती पहाता ती अत्यंत कमी आहे. त्यामुळे शासन आदेशाची अंमलबजावणी योग्य त-हेने होत नसल्याचे दिसते.

4) जिल्हा परिषद स्तरावरुन प्रकरणाचा निपटारा केल्यानंतर अधिकृत दस्तऐवजासह आदेशाची प्रत स्थानीक निधी लेखापरीक्षा विभागास सादर करणे आवश्यक असतांना विभाग अशी कार्यवाही करीत नसल्याचे आढळते त्यामुळे अफरातफर प्रकरणे व गुंतलेली रक्कम यांचा ताळमेळ लेखापरीक्षणास घेता येत नाही. याबाबत निपटारा प्रकरण आदेशाची प्रत स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागास सादर करण्यात यावी.

### 3.44 जिल्हा वार्षिक योजना सन 2015-2016 मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधासाठी ग्रामपंचायतींना विशेष अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत.

**जिल्हा परिषद नागपूर**, **सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद नागपुर येथील सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात जिल्हा वार्षिक योजना सन 2015-2016 मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधासाठी ग्रामपंचायतींना विशेष अनुदान वाटपाबाबत नस्तीची तपासणी केली असता रक्कम रूपये 5,41,01,567/- अनुदान वितरीत केल्याबाबत रोखपुस्तीकात खर्च नोंदविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-2610/ प्र.क्र.129/पंरा-4, दिनांक 16/09/2010 अन्वये या योजनेसाठी ग्रामपंचायतीने आराखडा तयार करुन त्यास ग्रामसभेची प्रशासकीय मान्यता घेतल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपुर यांनी प्रस्तावास मान्यता दयावयाची आहे. याबाबत दस्ताऐवज नस्तीबध्द नसल्याने वितरीत केलेली रक्कम रुपये 5,41,01,567/- मान्य करता येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-2612/ प्र.क्र.129/पंरा-4, दिनांक 21/11/2012 अन्वये सदर योजनेसाठी निवड झालेल्या ग्रामपंचायतींना 10 टक्के निधी स्वनिधी किंवा इतर स्त्रोतातुन उभारवयाचा असतांना याबाबत कोणतेही दस्ताऐवज नस्तीबध्द नाहीत.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-2610/ प्र.क्र.129/पंरा-4, दिनांक 20/10/2011 सदर योजनेसाठी ग्रामपंचायतींना निधी देतांना संबंधीत ग्रामपंचायत पर्यावरण संतुलित समृध्द ग्रामयोजनेत पात्र ठरलेली असणे आवश्यक असतांना सदर ग्रामपंचायती पर्यावरण संतुलित समृध्द ग्रामयोजनेत पात्र ठरल्याबाबत कोणतेही दस्ताऐवज नस्तीबध्द नाहीत.

4) जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपुर यांचे निधी वितरण आदेश क्रमांक जिनस/कार्या-37/जिवायो/का-9/2081/2015/2016, दिनांक 23/11/2015 मधील अटी व शर्ती नुसार बांधकामाचे वेगवेगळे पातळीचे छायाचित्र काढुन वेळोवेळी सादर करावे व अभिलेख्यासाठी संग्रही ठेवावे तसेच बांधकामे पुर्ण झाल्यानंतर कामांची नोंद मालमत्ता नोंदवहीत करुन नोंदविणे आवश्यक असतांना अश्या प्रकारची कार्यवाही केलेली नाही.

### 3.45 पावती पुस्तिकेच्या वसूल रक्कम शासन खाती जमा न करता केलेल्या अपहाराबाबत.

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद वर्धा चे सन 2015-16 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण दरम्यान पेटी कॅश बुक व पावती पुस्तकाची तपासणी केली असता दिनांक 27/04/2015 ते दिनांक 23/09/2015 या कालावधीत पावती पुस्तिकेच्या वसूल रकमेची नोंद रोख पुस्तिकेला न घेता व रक्कम शासन खाती जमा न करता श्री.विशाल मेहत्रे, कनिष्ठ सहाय्यक यांनी अपहार केल्याचे आढळले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 (सुधारित 2011) नियम 13 मध्ये पैशांचा भरणाबाबत निर्देश दिले असतांनाही संबंधीत रोखपालाने त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

2) शासन खाती निधी जमा न करता उपरोक्त प्रमाणे रक्कम रुपये 96,448/- अपहार केले असून सदर रक्कम संबंधीताकडून वसुल करण्याची कार्यवाही करावी. सदर निधी शासन खाती जमा करावा.

3) सदर प्रकरण बघता जिल्हा परिषद, वर्धा यांनी रक्कमेचा स्विकार धनादेश वा डी.डी. मध्ये घेण्याचे निर्देश सर्व विभागांना द्यावा व कुठल्याही परिस्थीतीत रोख स्वरुपात रक्कम स्विकारणे बंद करण्याचे निर्णय आपल्या स्तरावर घ्यावे जेणेकरुन याप्रकारचे अपहार होणार नाही, असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 मधील नियम 3 चे उल्लंघन केल्यामुळे संबंधीत कर्मचा-यावर महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 चे भाग 4 नुसार शिस्तभंगाची कार्यवाहीस पात्र ठरते.

**3.46 नैसर्गिक आपत्ती करीता लाभार्थ्यांना लाभ देणेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परीषद भंडारा येथील सन 2015-2016 या वित्तिय वर्षाचे लेखापरीक्षणात असे निदर्शनात आले की, पंचाय**त** विभागाने नैसर्गिक आपत्ती करीता लाभार्थ्यांना लाभ देणेबाबत स्थायी समीती सभा ठराव क्रमांक 5/4, दिनांक 18/08/2015 व दिनांक 19/03/2016 अनवये लाभार्थ्याची यादीला प्रशासकिय मंजुरी (रुपये 15,00,000/- ला) घेवून सन 2015-16 करीता एकुण रुपये 12,00,000/- खर्च दर्शविण्यात आलेले आहे. त्यापैकी नैसर्गिक आपत्ती करीता लाभार्थ्यांना लाभ देणे बाबत 3 प्रमाणकांन्वये रक्कम रुपये 5,65,000/- खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम-1001//प्र.क्र.1144, दिनांक 24/12/2001 अन्वये नैसर्गिक आपत्ती करीता लाभार्थ्यांना लाभ देणे बाबत प्रदान केल्याबाबत, धनादेशांच्या स्थळ छायाकींत प्रती पाहवयास मिळाले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, झेडपीए/2008, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेव्दारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनाचे नियोजन व अमंलबजावणीचे वेळापत्रकाकडे दुर्लक्ष करुन योजना राबविण्यात आल्याचे निदर्शनास येते.

3) सदर योजनेकरीता 3 टक्के अपंगांनासुध्दा लाभ देणे आवश्यक आहे.

4) कृषी व पशु विभाग, शासन निर्णय दिनांक 01/09/2000 नुसार निवड केलेल्या लाभधारकास दिनांक 01/05/2001 नंतर एकुण अपत्याची संख्या 3 पेक्षा जास्त झाल्यास त्यांना लाभ देवु नये असे स्पष्ट नमुद असतांना त्याबाबत प्रमाणपत्र पाहावयास मिळाले नाही.

5) लाभर्थ्यांना या योजनेचा लाभ झाल्यास उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुल्यांकन अहवाल देणे आवश्यक आहे.

6) योजनेतील अटीशर्ती 5 प्रमाणे या योजनेचा लाभ घटना घडल्यापासुन एक वर्षाच्या आतील प्रकरणास लाभ देय राहील असे असतांना श्री.आनंदराव कान्हा पटले,पोवारटोली साकोली यांचे धानाचे पुंजणे आगीने दिनांक 08/05/2014 ला जळाले. हे सदर प्रकरण सन 2014-15 चे असल्यामुळे सन 2015-16 ला दिलेले लाभ अनुदेय नाही. सबंधिताकडून रक्कम रुपये 5,000/- वसूलपात्र ठरते.

**3.47 सि.सि.टी.व्ही. कॅमेरा खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रुपये 10,85,673/- खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सिद्धांत इनफोटेक चंद्रपूर यांनी सादर केलेले बील क्रमांक 283, दिनांक 19/12/2015 रुपये 11,07,830/- मध्ये बाब क्रमांक 10 Power cable & casting (polycab) हे 3,965 मीटर चा उल्लेख आहे. परंतु सिद्धांत इनफोटेक चंद्रपूर यांचा दिनांक 30/11/2015 चा Installation report ची तपासणी केली असता त्यामध्ये बाब क्रमांक 10 Power cable & casting (polycab) हे 1,260 मीटर जिल्हा परिषद इमारत गोंदिया येथे

लावल्याचा उल्लेख आहे. त्यामुळे बीलामध्ये जादा लावलेले बाब क्रमांक 10 Power cable & casting (polycab) 2,705 मीटरची रक्कम रुपये 40/- प्रमाणे रक्कम रुपये 1,08,200/- वसूलपात्र ठरते.

2) सि.सि.टी.व्ही. कॅमेरे कोणत्या विभागात किती बसविले तसेच जिल्हा परिषद इमारतीबाहेर / इमारतीवर किती नग बसविले याचा उल्लेख नाही. सदर सि.सि.टी.व्ही. कॅमेरे केव्हा प्राप्त झाले याबाबतचे डिलेव्हरी चालान नस्तीमध्ये उपलब्ध नाही. तसेच सि.सि.टी.व्ही. कॅमे-यांची नोंद साठा पुस्तकाला घेण्यात आली नाही.

**3.48 वाहन खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** जिल्हा परिषद, गोंदिया येथील सामान्य प्रशासन विभागाचे सन 2015-16 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकरिता 1 Fiat या कंपनीचे Linia हे वाहन खरेदी केलेले आहे. सदर नस्तीची तपासणी करित असता असे निदर्शनास आले कि, सदर विभागाने वाहन खरेदी करणेबाबत दरपत्रके मागविण्याबाबतचे कार्यालयाचे सुचना पत्र क्रमांक 1564, दिनांक 07/07/2015 अन्वये दिनांक 12/07/2015 पर्यंत मोहरबंद लिफाप्यात दरपत्रके मागविण्याबाबत सुचना फलकावर सुचनापत्र लावणेत आले. व त्यानुषंगाने तीन पुरवठादार यांचेकडून प्राप्त झालेले दरपत्रके उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून उघडण्यात आले असून सर्वात कमी दर असलेली तुलनात्मक तक्त्यातील अनु क्रमांक 3 चे Jaika Cars Nagpur यांची रूपये 5,99,000/- ची कमी दराची निविदा असल्यामुळे त्यांना पुरवठा आदेश क्रमांक 1600, दिनांक 13/07/2015 अन्वये देण्यात आला व त्यानुषंगाने पुरवठादाराचे टॅक्स अन्व्हाईस क्रमांक ANC/15/07/0001, दिनांक 13/07/2015 अन्वये वाहनाचा पुरवठा करण्यात आल्याबाबत नमुद आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2010/275/प्र.क्र.172/पंरा-7, दिनांक 19/10/2011 नुसार रक्कम रूपये 1,00,000/- वरील कोणतेही साहित्य खरेदी करावयाचे असल्यास e-Tendering च्या माध्यमातुन खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच राज्य शासनाने वा केंद्र शासनाने ज्या-ज्या वस्तु व सेवांसाठी दरकरार केलेले आहेत, त्या वस्तु दरकरारात नमुद यंत्रणेकडूनच खरेदी करणेबाबत नमुद असून संबंधीत वस्तुचा दर्जा व प्रत दर्जेदार असल्याचे खातरजमा करूनच खरेदी करणे आवश्यक आहे. परंतु नस्तीची तपासणी केली असता e-Tendering च्या माध्यमातुन खरेदी केल्याचे दिसून न आल्याने बाजारातील स्पर्धात्मक दराचा लाभ मिळाला असे म्हणता येत नाही. तरी खुलाशासह अनुपालन सादर करावे.

**3.49 जिल्हा परिषद चद्रपूर माहीती प्रसिध्दी करण्यासाठी मोबाईल व्हॅन सुविधा बाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** प्रमाणक्र क्रमांक 415, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रूपये 13,39,800/- मिडीया सोलूशन प्रा.लि. जिल्हा परिषदचंद्रपूर माहीती प्रसिध्दी करण्यासाठी (मोबाईल व्हॅन) चित्ररथ भाडयाने घेणे साठी वरील पुरवठाधारक यांना रक्कमेचे प्रदान करण्यात आले आहे.

सदर कामासाठी ई-टेडरीग 3 वेळा करण्यात आली व एकच निविदा प्राप्त झाल्याने निविदा उघळण्यात आली व वाटा घाटी करून रूपये 6,800/- ची निविदा रुपये 6,600/- मध्ये प्रति वाहन प्रति दिवस 150 कि.मी. अंतराकरीता दिनांक 22/02/2016 ते 29/03/2016 पर्यंत 35 दिवसाचे कालावधीत एकूण 6 चित्ररथ व्दारे 836 ग्रामपंचायतिंना प्रचाराचा करीता आदेश देण्यात आले. सदर योजनेस प्रशासकीय मंजूरी व तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील काम हे वाहन वापरून करण्यात आल्याने व करारनामा केल्याने आयकर कायदा 1961 चे कलम 194(आय) प्रमाणे मशीनरी संयंत्राच्या भाडे प्रदानातून 10 टक्के सदर फर्मच्या देयकातून रुपये 1,33,980/- आयकर कपात केलेला नाही.

2) प्रति दिवस प्रति वाहन 150 कि.मी. अंतराकरीता रूपये 6,600/- या स्विकृत दराने भाडे पध्दीवर प्रचार कामाकरीता देण्यास तयार आहेत. तसेच मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडून वेळोवेळी देण्यात

येणाया पुरवठा आदेशातील कार्यक्रमा नुसार प्रचारा करीता चित्ररथ वाहन वापरून प्रचार करण्याची जबाबदारी ही पार्टी नं.1 याची राहील. असे असताना किलोमिटर प्रमाणे (6600÷150) = 44 किलो मिटर प्रमाणे एकूण किलोमिटर 11684 x 44 = 5,14,096/- चे शोधन करणे आवश्यक असताना संबंधिताना रूपये 13,39,800/- चे शोधन करण्यात आले आहे. रूपये 8,25,704/- जादा शोधन करण्यात आले आहे. जादा प्रदान बाबत संबधीता वर नियमा प्रमाणे (वसुलिची) कार्यवाही होणे आवश्यक आहे.

अर्धसमास पत्रान्वये विचारणा केली असता अर्धसमास पत्राच्यानुषंगाने अनूपालन सादर करण्यात आले नाही आहे. जर किलोमिटर प्रमाणे वाहन वापराचे नसल्यास तसी 150 किलोमिटर ची मर्यादा ची अट नमुद न करता सरसंकट रूपये 6,600/- प्रति दिन फक्त हीच नमुद केले असते.

3) शासना मार्फत होणारी सर्व प्रकारची प्रदाने ईसीएस/एनईएफटी मार्फत करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1010/प्र.क्र.68 कोषा प्र-5, दिनांक 18/04/2011 मधील क्रं ix) मागणीदारांना प्रदान करावयाची रक्कम अदा करण्यासाठी कार्यालयात बोलविण्यात येवू नये कारण प्रदान देय झाल्यानंतर मागणीदाराच्या खात्यात जमा करण्याचे उत्तरदायित्व हे त्या कार्यालय प्रमुखावर आहे. मागणीदारांवर नाही. यानुसार संबधीत विभगाने रूपये 95,000/- इतकी रक्कम संबंधित पुरवठाधारकास धनादेशाने अदा करण्यात आली आहे. त्यामुळे शासन निर्णयाचे पालन करण्यात आले नाही.

4) करारनामा अट क्रमांक 9 नुसार प्रचाराकरीता तयार करण्यात येणारे फलॅक्स बॅनर बोर्डव इतर साहीत्य हे कार्यालयाकडून देण्यात येणा-या नमुण्यात तयार करून वापरण्याची जबाबदारी ही पार्टी क्र.1 ची राहील असे असताना संबधीताना सदर साहीत्य केव्हा प्राप्त केले या बाबत अभिलेखे व नस्ती नोद दिसून आली नांही. करार नामा अट क्र.11 नुसार प्रचाराचे काम सूरू करण्यापुर्वी रूपये 50,000/- इतकी सूरक्षा ठेव रक्कम ठेवणे बाबत अट असताना त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात आल्याचे दिसून आले नांही.

**3.50 ब्लिंचिंग पावडर खरेदी करून ग्रामपंचायतींना पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 24,99,840/- खर्च करण्यात आला आहे.

सामान्य प्रशासन विभागाचे सन 2015-16 या वित्त्तीय वर्षाचे लेखापरिक्षण केले असता जिल्हा निधी अंर्तगत 13 वने 7 टक्के वन महसुल अनुदान या लेखाशिर्षातुन वनपरिक्षेत्रातील ग्रामपंचायती अंतर्गत ग्रामस्थांना साथरोग होवु नये म्हणुन पिण्यांचे-पाणी शुध्दीकरणासाठी ब्लिंचिंग पावडर खरेदी करून ग्रामपंचायतींना पुरविण्यांकरिता रुपये 35 लक्ष ची सुधारित तरतुद मंजुर करण्यांत आली असून योजना राबविण्यांस जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक 18/02/2016 चे ठराव क्रमांक 2 नुसार मंजुरी प्रदान करण्यांत आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेशानुसार पंचायत समिती - कुरखेडा व भामरागड यांचे पोहोच पावतीवर दिनांकात खाडाखोड केल्याचे दिसून येते म्हणजेच ब्लिचिंग पावडर उशीराने पुरवठा केल्याचे स्पष्ट होते. परंतु करारनाम्यातील अट अ.क्र-1 नुसार प्रती दिवस रुपये 100/- प्रमाणे दंडाची कपात करणे आवश्यक असतांनाही देयकातुन दडाची रक्कम कपात केले नाही.

2) प्रमाणक क्रमांक 1282, दिनांक 31/03/2016, रुपये 9,99,936/- मधुन दंड कपात रुपये 4,300/- नेट रुपये 9,95,636/- प्रदान करण्यांत आले परंतु दंडाची रक्कम रुपये 800/- कमी कपात केल्याचे दिसुन आले. पुरवठा आदेश क्रमांक 561,14/01/2016 पुरवठादाराला दिनांक 15/01/2016 ला प्राप्त झाल्याची रिसीव्हड प्रत अभिलेख्यांत आहे.

3) पंचायत समिती स्तरावरील साठा-पुस्तक उपलब्ध केले नाही. त्यामुळे पंचायत समितीला प्राप्त झालेले ब्लिचींग पावडर ग्राम पंचायतींना कधी / केव्हा वाटप केले आणि ग्रामपंचायतींना प्राप्त झालेले ब्लिचिंग पावडर कधी उपयोगात आणले याबाबतचे पंचायत समितीनिहाय वाटप अहवाल व उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करण्यांत आले नाही.

5) सुधारित अंतीम तरतुद रुपये 35 लक्ष मंजुर असतांनाही वित्तीय वर्षात रुपये 24,99,840/- खर्च करण्यांत आल्यामुळे रुपये 10,00,160/- इतकी रक्कम शिल्लक राहिल्यामुळे कमी उत्पन्नाच्या व डोंगराळ भागातील गरजु ग्रामपंचायतींना योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या असून त्या भागात कमी प्रमाणात पिण्यांचे-पाणी शुध्द करून मिळाल्याचे स्पष्ट होते.

**3.51 पुर्व परवानगी न घेता शासकीय वाहनाने कार्यक्षेत्रा बाहेर / जिल्हयाबाहेर प्रवास (दौरे) करणेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सामान्य प्रशासन विभागाचे सन 2015-16 या वित्त्तीय वर्षातील लेखापरिक्षणांत शासकीय वाहनाची रोजवही (लॉग बुक) तपासले असता, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) अधिका-यांने पुर्व मंजुरी न घेता जिल्हा परिषद चे शासकीय वाहन कार्यक्षेत्राबाहेर (जिल्हयाबाहेर) कार्यालयीन कामाकरिता वापर (दौरे) केल्याचे आढळून आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक जेईपी-1093/सीआर-914/26, दिनांक 02/08/1993 नुसार जिल्हा परिषदेचे अधिकारी तसेच पदाधिकारी यांना अती महत्वांचे कार्यालयीन कामाकरिता कार्यक्षेत्राबाहेर वाहनाने प्रवास करावयाचा झाल्यास किंवा वापरातील वाहन त्यांच्या अधिकार क्षेत्राबाहेर वापरावयाचे झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा परिषद अध्यक्षांची महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक क्रमांक जेईपी-10/सीआर-59/2000/05, दिनांक 24/04/2000 अन्वये पुर्व परवानगी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

2) पुर्व परवानगीशिवाय त्यांच्या वापरातील वाहन अधिकार क्षेत्राच्या बाहेर वापरल्यास अशा प्रस्तावास कार्योत्त्तर मंजुरी दिली जाणार नाही. त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत अधिकारी / पदाधिकारी यांची राहील असे नमुद असल्याने उपरोक्त्त प्रमाणे संबंधीतांनी पुर्व परवानगी न घेता त्यांच्या वापरातील वाहन अधिकार क्षेत्राच्या बाहेर वापर केलेला असल्यामुळे महाराष्ट्र शासन, वित्त्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वाहन-2014/प्र.क्र.23/14/ विनियम, दिनांक 30/05/2014 नुसार शासकीय वाहनांचा खाजगी कामासाठी वापर केल्याचे समजुन संबंधीत अधिकारी यांनी वरिलप्रमाणे केलेला दौरा हा शासकीय न समजता वैयक्तीक समजुन त्यांचेकडून सरसकट रुपये 12/- प्रमाणे प्रती किलोमीटर या दराने वसुली करण्यांत यावे असे नमुद असल्यामुळे संबंधीताकडून रक्कम रुपये 2,00,340/- वसुल करून निधीत जमा करणे आवश्यक आहे.

**3.52 ग्रामपंचायत अपहारीत रक्कमा वसुलीच्या प्रलंबित प्रकरणाबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी सादर केलेल्या विवरणपत्रानुसार अपहार प्रकरणांच्या नोंदवहीच्या गोषवा-यावरून सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणात दिनांक 31/03/2016 अखेर ग्रामनिधी व जवाहर रोजगार योजनेची एकूण 34 प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यात ग्रामनिधी मधील 6 प्रकरणात रुपये 1,64,114/- व जवाहर रोजगार योजनेच्या 28 प्रकरणात रुपये 7,70,986/- अशी एकूण 34 प्रकरणात रुपये 9,35,100/- शासन रक्कमेचे नुकसान झालेले असून सदर रक्कम अद्याप पावेतो वसूल होणे बाकी आहे. तेव्हा शिघ्रगतीने अपहार प्रकरणे निकाली न काढलेबाबत खुलासा करावा.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-1016/प्र.क्र.115/21-अ, दिनांक 27/06/1996 नुसार विस्तार अधिकारी यांनी त्यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील 10 ग्रामपंचायतीचे सखोल निरिक्षण प्रत्येक महिन्यात करून त्या संदर्भातील एकत्रित वार्षिक अहवाल जिल्हा परिषद मार्फत विभागीय आयुक्तांना पाठविणे आवश्यक आहे. याबाबतची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तेव्हा ग्रामपंचायत अफरातफरीच्या एकूण 34 प्रकरणातील रुपये 9,34,100/- च्या अंतर्भुत असलेल्या रक्कम त्वरीत वसूल करण्यासंबंधी

कडक कार्यवाही करून सदर प्रकरणातील सर्व ग्रामपंचायतींकडून वसूली करून रकमा शासन निधीत जमा करून चलन लेखापरीक्षणात दर्शवून पुर्तता करावी.

**3.53 धान्य अग्रीम वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** जिल्हा परिषद, जालना यांचे सामान्य प्रशासन विभागाचे सन 2015-2016 लेखापरिक्षण करीत असतांना धान्य अग्रीम यावर रक्कम रूपये 52,90,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना कोणत्या प्राधिकाराने धान्य अग्रीम मंजूर करण्यात आली? याबाबत खात्री करता आली नाही. केवळ सर्व सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर करुन धान्य अग्रीम बिन व्याजी वाटप केलेले आहे. करीता प्राधिकार व ठराव दर्शवून अनूपालन सादर करावे.

2) जिपजा/साप्रवि/प्रशा-5/2015/2163,दिनांक 06/05/2015 चे मंजूरी आदेशान्वये रक्कम रूपये 5,29,000/- अग्रीम मंजूर करण्यात आला असून त्या रक्कमांचे मार्च-2016 अखेर समायोजन झाले किंवा नाही, याबाबत खात्री करता आली नाही.

3) सन 2015-2016 च्या मूळ अर्थसंकल्पात धान्य अग्रीम या शिर्षाखाली 56,00,000/- ची तरतूद करण्यात आली होती. परंतू, दिनांक 22/03/2016 च्या सर्व साधारण सभेत सुधारीत अंदाजपत्रकात रूपये 81,00,000/- लाख तरतूद मंजूर करण्यात आली. दिनांक 06/05/2015 अन्वये रूपये 52,90,000/- मंजूर करून वाटप ही करण्यात आले. वाढीव तरतूद कशासाठी केली? याबाबत खुलासा करावा.

4) वरील अग्रीमाच्या तरतूदीमूळे विकास कामावर विपरीत परिणाम होत आहे. याबाबत खुलासा करावा.

**3.54 जमीन महसुल उपकरावरील वाढीव उपकर वितरणाबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद बीड चे सन 2015-2016 च्या लेखापरिक्षणात उपलब्ध केलेल्या अभिलेख्यावरुन जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय बीड यांनी ग्रामपंचायतींना जमीन महसुल उपकर अनुदान रक्कम रूपये 2,25,28,104/- वितरणासाठी दिलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधिल कमल 155 (6), 185, 186 मधील तरतूदी नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना स्थानिक उपकर सापेक्ष अनुदान व मुळ उपकरातील प्रोत्सानपर अनुदाने वितरीत करण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती शासनाचे निर्णय दिनांक 22/04/1992 च्या निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. उपरोक्त शासनाचे निर्णयानुसार सन 2015-2016 च्या वितिय वर्षात जमीन महसुल उपकरावरील वाढीव उपकर अनुदाने जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त झाले आहेत. त्यानुसार जिल्हा परिषदेला मिळालेल्या वाढीव उपकरातील 40 टक्के रक्कम जिल्हा परिषदेला उर्वरीत 60 टक्के रक्मम पंचायत समितीला वाटप करणे आवश्यक आहे व प्रोत्सानपर अनुदान 65 टक्के रक्कम पंचायत समितीला वाटप करणे आवश्यक आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक एल.एस.सी.1092/सीआर/963/24, दिनांक 22/04/1992 मधील तरतुदी व शासनाचे या संदर्भात वेळोवेळी निर्देशित केलेल्या सुचना व शर्तीचे पालन करावे व सदरचे अनुदान दिनांक 31/03/2016 पूर्वी आहारण करणे बंधनककारक आहे. परंतु, सन 2015-2016 मधील पंचायत समितीला वितरीत करावयाचे अनुदान रूपये 167.28 लक्ष वितरीत केलेले नाही. ही बाब नियमबाहय आहे.

**3.55 ग्रामपंचायत लेखापरीक्षणास अभिलेखे न पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** 68 ग्रामपंचायतीनी 110 घटकांचे वारंवार लेखी व तोंडी मागणी करुनही लेखापरीक्षकास ग्रामपंचायतीचे अभिलेखे उपलब्ध करुन दिलेले नाहीत. त्याबाबत त्यांच्यावर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 नुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.56 स्टेशनरी खरेदीतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, परभणीचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात प्रमाणक क्रमांक 696, दिनांक 31/03/2016 अन्वये विविध स्टेशनरी खरेदीसाठी मे.अनिल जनरल स्टोअर्स, रामकृष्णनगर, परभणी यांना रुपये 1,79,520/- प्रदान केल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 03/01/2013 मधील टिप एक व चार नुसार कार्यवाही केलेली नाही.

2) लेखापरीक्षणात सादर संचिकेची तपासणी केली असता, आधी जा.क्र.जिप/साप्रवि/ भांडार/कावि/45/16, दिनांक 26/02/2016 अन्वये रुपये 90,360/- साठी प्रशासकीय मान्यता देऊन अर्थ विभागाकडे संचिका पाठवली आहे. परंतू, अर्थ विभागाने जिल्हा परिषद आकस्मिक खर्च नियम 1968 मधील तरतुदीचे पालन करुन खरेदी करावी, असे नमुद करुन संचिका विभागास परत पाठवली आहे. त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाने सदरील प्रशासकीय मान्यता आदेश रद्द करुन जा.क्र./जिप/साप्रवि/भांडार/कावि/61/16, दिनांक 22/03/2016 अन्वये रुपये 1,80,000/- साठी सुधारीत प्रशासकीय मान्यता देऊन खरेदी केली आहे. तथापि, सदरील खरेदीसाठी त्यापुर्वीच म्हणजे जा.क्र./जिप/साप्रवि/भांडार/कावि/59/16, दिनांक 16/03/2016 नुसार नोटीस बोर्डवर दरपत्रके मागवण्यास नोटीस लावून (1) अनिल जनरल स्टोअर्सचे दिनांक 17/03/2016 (2) दर्पण जनरल स्टोअर्सचे दिनांक 19/03/2016 व (3) सौरभ जनरल स्टोअसेचे दिनांक 18/03/2016 दरपत्रके प्राप्त करुन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन अनिल जनरल स्टोअर्स यांचे दर कमी असल्यामुळे त्यांचेकडुन खरेदी केली आहे. तथापि, महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग III/ उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील 3.1.1.2 नुसार प्रशासकीय आदेश काढल्यानंतरच खरेदी करणे आवश्यक असताना उक्त प्रकरणात अशी कार्यवाही झाल्याचे आढळून आले नाही.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील 2.9.3 ब नुसार खरेदी समिती गठीत करुन खरेदी प्रक्रिया राबवणे आवश्यक आहे. तथापि, उक्त खरेदीचे संदर्भात दिनांक 22/03/2016 चे खरेदी समितीचे पत्रावर महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, परभणी अथवा त्यांचे प्रतिनिधी यांची स्वाक्षरी आढळून आली नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील 2.9.3 ब नुसार गठीत केलेल्या समितीने खरेदी प्रक्रियेच्या संबंधीत सर्व टप्प्यांवर निर्णय घेणे आवश्यक असताना सादर संचिकेतील प्राप्त झालेल्या दरपत्रकांच्या लिफाफ्यांची तपासणी केली असता त्यावर सदरील लिफाफे उघडल्याबाबत केवळ उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांचीच स्वाक्षरी आढळून आली आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) भारत सरकार आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 मधील तरतुदीनुसार रुपये 20,000/- पेक्षा जास्त देयकाच्या देय रकमेच्या 2.34 टक्के आयकर ॲट सोर्स कपात करणे आवश्यक आहे. तथापि, सदरील देयकाचे प्रदानातुन रुपये 4,201/- एवढा आयकर कपात करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न झाल्यामुळे संबंधीतास रुपये 4,201/- चे जादा प्रदान झाले आहे. ते संबंधीताकडुन वसुल करुन आयकर खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**3.57 ग्रामपंचायतीच्या अपहार अहवालावर कार्यवाहीबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडएनजी-1009/प्र.क्र.57/ आस्था-5, दिनांक 06/04/2009 प्रमाणे जिल्हा परिषदेकडील अफरातफर तसेच गैरव्यवहार प्रकरणात गुंतलेल्या शासकीय रकमेच्या वसुली संदर्भात ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर विवक्षीतपणे जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे, अशा अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून करावयाच्या वसुलीबाबत न्यायालयाचे स्पष्ट असे स्थगिती आदेश नसल्यास

अशी वसुली कोणत्याही परिस्थीतीत स्थगित करु नये, असे नमुद असताना उक्त प्रकरणाचे संदर्भात योग्य ती कार्यवाही करुन वसुलीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

2) लेखापरीक्षणात उपरोक्त विषयाचे संदर्भात सादर संचिकेची तपासणी केली असता सन 2015-2016 मध्ये प्राप्त झालेल्या गोपनीय अहवालांचे बाबतीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी वेळोवेळी संबंधीत गटविकास अधिकारी यांना पत्र दिली आहेत. तथापि, संचिकेतील अभिलेख्याप्रमाणे केवळ गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पुर्णा यांनी सोनखेड ग्रामपंचायतीचे जा.क्र.पंसपू/पंचायत/कावि/2907/2015 दिनांक 30/12/2015 नुसार श्री.एस.एल.सुरेवाड, विस्तार अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा यांना चौकशी करण्यास पत्र दिले आहे व लेखापरीक्षण कालावधीपावेतो सदरील ग्रामपंचायतीचीही चौकशी पुर्ण झाल्याबाबत अथवा प्रकरण निकाली काढण्याबाबत कार्यवाही झालेली नाही. याबाबत तसेच ईतर प्रकरणांबाबत गटविकास अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा खुलासा होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-2017/प्र.क्र.26/वित्त-9, दिनांक 08/06/2017 मधील अनुक्रमांक 01 ते 05 मधील सुचनांचे पालन होणे आवश्यक आहे. सबब उक्त अभिप्रायांची पुर्तता करावी.

### 3.58 ग्रामपंचायत स्तरावर सौर पथदिवे बसविणेबाबत

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 118 अन्वये दिनांक 31/12/2015 रक्कम रूपये 13,50,900/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक सौऊदि-2013/प्र.क्रं.14/ प.रा-06, दिनांक 28/03/2013 च्या शासन निर्णयानुसार आर्थिक वर्षात पर्यावरण संतुलीत समृध्द ग्राम योजनाअंतर्गत दुस-या वर्षी पहिल्या वर्षाचे व दुस-या वर्षाचे निकष पुर्ण करुन पात्र ठरलेल्या ग्रामपंचायतीना सौरपथदिवे बसविण्यासाठी पुढीलप्रमाणे वितरीत करण्याचे सुचविले आहे. ग्रामपंचायतीच्या रस्त्यावर सौर पथदिवे बसविण्यासाठी महाराष्ट्र उर्जा विकास प्राधिकरणाने निर्गमित केलेल्या दरकरारानुसार एका सौर पथदिव्याची किंमत रूपये 19,750/- एवढी निश्चित केलेली आहे. त्यामध्ये पुढीलप्रमाणे हिस्याचे दर निश्चीत केलेले आहे. 1.राज्याचा हिस्सा रूपये 9,600/- 2. केद्रं शासन हिस्सा रूपये 5,925/- 3. ग्रामपंचायत हिस्सा रूपये 4,225/- प्रत्येक पथदिव्यासाठी यानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी 3 पथदिवे बसविण्याचे असुन पात्र ठरलेल्या 76 ग्रामपंचायतीस 228 पथदिवे बसविण्याचे उद्दिष्ट होते. शासन निर्णय क्रमांक सौरउर्जा दिनांक 2010/प्र.क्रं.14/ परा9, दिनांक 02/10/2010 (क) नुसार सदर योजना महाराष्ट्र उर्जा विकास प्राधिकरणाच्या दरकरार पत्रावर असलेल्या एजन्सीकडुन करुन घेण्याचे निर्देशित आहे. तसेच सौरपथदिवे बसविण्याच्या योजनेस मंजुरी शासनाने दिल्यामुळे तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मंजुरी घेण्याचे आवश्यकता नसल्याने शासनाने दिनांक 27/07/2011 चे मार्गदर्शक सुचनेमध्ये नमुद केलेले असल्यामुळे तसेच मेडाचे दर शासनाने मंजुर केल्यामुळे वरील प्रमाणे 76 ग्रामपंचायतीसाठी पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

प्रमाणक क्रमांक 118, दिनांक 31/12/2015 अनव्ये 76 ग्रामपंचायतींमध्ये 3 याप्रमाणे 228 सौरपथदिवे स्थापित केल्याबाबत रूपये 13,50,900/- केद्रांचा हिस्सा उपरोक्त प्रमाणकान्वये प्राप्त झालेला आहे. मागील वर्षात पथदिवे स्थापित केल्याबाबत ग्रामपंचायत हिस्सा रूपये 9,63,300/- + राज्य हिस्सा रूपये 21,88,800/- = रूपये 31,52,100/- अदा केलेले आहेत. चालु वर्षात रूपये 13,50,900/- असे एकुण सौरपथदिवेची रक्कम रूपये 45,03,000/- अदा केलेली आहे. तरी मागील वर्ष व चालु वर्षात अदा केलेले रकमेचा ताळमेळ घेऊन पथदिवेची किंमत रूपये 19,750/- एवढी असल्याचे खात्री करून अनुपालन दर्शवावे.

2) करारानामा रूपये 200/- च्या करारपत्रकावर आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/प्र.क्रं.514/वित्त-9, दिनांक 20/11/2009 नुसार कराराची रक्कम रूपये 10 लक्ष पेक्षा अधिक असेल तर मुद्रांकशुल्क 10 लक्ष वरील प्रत्येकी रूपये 1,00,000/- रुपयासाठी रूपये 100/- आहे. सदरील कामाच्या कराराची (सुधारीत) रक्कम रूपये 45,03,000/- असल्यामुळे रूपये 100/- प्रमाणे मुद्रांक शुल्काची

रक्कम रूपये 3,600/- येते. परंतु, रूपये 200/- च्या मुद्रांक शुल्कावर करारनामा केलेला आहे. रूपये 3,400/- मुद्रांक शुल्क कमी आकारले आहे. सबब कमी आकारलेले मुद्रांक शुल्क रूपये 3,400/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

3) सौरपथदिवे आस्थापित झाल्यानंतर महा उर्जा, पुणे कार्यालयास कळविण्यात यावे. त्यानंतर महा उर्जा मार्फत आवश्यकतेनुसार सौर पथदिव्यांची तपासणी करण्यात येऊन अशी तपासणी करुन योजना सफल झाल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुरवठादारास देयक अदा करण्यात यावे. असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता देयक अदा केले.

4) इतर योजनेतूनही सौरपथदिवे बसविले जात असलेमुळे परत त्याच ग्रामपंचायतीमध्ये व त्याच ठिकाणी सौरपथदिवे बसविलेले असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

### 3.59 माळेगाव यात्रेवर जिल्हा परिषद उपकरातुन केलेल्या खर्चाबाबत.

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रूपये 24,61,150/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 210 ब नुसार प्रलंबीत अग्रीम असेल तर नवीन अग्रीम देण्यात येवु नये, अशी तरतुद आहे. तसेच शासन निर्णय दिनांक 10/12/2010 अन्वये अग्रीमांची वसुली / समायोजन होणे आवश्यक आहे. कार्यालयीन टिपणी क्रमांक 16 नुसार माळेगाव यात्रे करीता देण्यात आलेल्या अग्रीमापैकी रुपये 1,10,60,716/- एवढे अग्रीम प्रलंबीत असल्याचे नमुद आहे. एवढ्या प्रमाणात अग्रीमाचे समायोजन बाकी असतांना व पुर्वीचे अग्रीम समायोजन न करता रूपये 10,00,000/- चे अग्रीम मंजुर केले आहे. यावर खुलासा होणे आवश्यक आहे. कार्यालयीन टिपणी नुसार 10 लाखाचा धनादेश क्रमांक 625695, दिनांक 05/12/2016 उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचे बँक खाते नसल्यामुळे सदर चा धनादेश जिल्हा ग्रामविकास निधीत खाते क्रमांक 62005899192 मध्ये जमा करुन व उचल करुन खर्च करण्याचे प्रस्तावित केले. कार्यालयीन टिपणी क्रमांक 32 प्रमाणे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता प्रदान केली. सदरचा धनादेश जमा केले बाबत व बँकेतुन उचल केल्याच्या नोंदीची पडताळणी बँक पासबुक व जिल्हा ग्रामविकास निधी रोजकिर्द अभावी पडताळणी करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस/2014/प्र.क्र.82/ भाग-3/उदयोग, दिनांक 30/10/2015 प्रमाणे साहित्य खरेदीसाठी उचीत कार्यवाही केलेली नाही. तसेच दरपत्रके विहीत मुदतीत प्राप्त झालेबाबत लिफाफ्यावर दिनांक नमुद केला नाही.

3) माळेगाव यांत्रेसाठी साहित्य खरेदी व भोजन व्यवस्था, सभा मंडप ईत्यादी बाबीवर प्रस्तावीत केल्यानुसार सुमारे 25 लाख रुपये खर्च अपेक्षीत होता व त्याप्रमाणात विविध खरेदी व पुरवठाबाबत वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन दरपत्रके मागविली असती, तर स्पर्धात्मक दराचा फायदा झाला असता. परंतु, केवळ 03 पुरवठादाराकडुन दरपत्रके प्राप्त करुन पुरवठा आदेश दिले आहेत. त्यामुळे आर्थिक नुकसान झाल्याची शकयता नाकारता येत नाही.

4) निवड समिती गठीत केल्याबाबत अहवाल दर्शविला नाही.

5) खरेदी केलेल्या विविध साहीत्याबाबत साठा विनियोग नोंदवहया ठेवलेल्या नाहीत.

### 3.60 तांत्रिक मनुष्यबळ मोबदला प्रदानाबाबत.

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** 13 वा वित आयोग योजनेतर्गत ईपीआरआय / ई - पंचायत प्रकल्पासाठी महाऑनलाईनतर्फे कंत्राटी पध्दतीने ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तांत्रिक मनुष्यबळाचे मोबदल्याची अदायगी 8 प्रमाणकांनुसार रक्कम रुपये 2,84,55,782/- करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 13 वा वित्त आयोग योजनेतर्गत ईपीआरआय / ई - पंचायत प्रकल्पासाठी महाऑनलाईनतर्फे कंत्राटी पध्दतीने जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तांत्रिक मनुष्यबळाचे

मोबदल्याची अदायगी करतांना आयकर अधिनियमाचे कलम 194 जे नुसार 10 टक्के आयकर कपात करण्यात आला आहे. परंतु, वरील प्रमाणकान्वये ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तांत्रिक मनुष्यबळाचे मोबदल्याची अदायगी 02 टक्के आयकर कपात करुन करण्यात आली आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 12 दिनांक 27/10/2016 नुसार खुलासा करणेबाबत कळवुनही अर्धसमास पत्र अनुत्तरित ठेवण्यात आले. आयकर अधिनियमाचे कलम 194 जे नुसार कंत्राटदराचे देयकातुन 10 टक्के आयकर कपात करण्यात आलेला नाही. कमी कपात आयकराची रक्क्म रूपये 20,12,308/- संबधिताकडुन वसुल करुन पुर्तता शासन खाती भरणा दर्शवावी.

2) ईनव्हाइस देयकाची गटविकास अधिकारी यांनी तपासणी करुन पंचायत समिती स्तर व ग्रामपंचायत स्तरचे मंजुर पदे, प्रत्यक्ष उपस्थिती व प्रत्यक्ष कामकाजाचा अहवाल (Performance Report) सादर केल्यानंतरच त्या अहवालानुसार ताळमेळ घेवुन उर्वरित 10 टक्के रक्क्मेची अदायगी करावयाची असतांना 100 टक्के देयकाची अदायगी कोणत्या आधारे करण्यात आली व पंचायत समिती स्तर व ग्रामपंचायत स्तरचे मंजुर पदे, प्रत्यक्ष उपस्थिती व प्रत्यक्ष कामकाजाचा अहवाल याबाबतची अभिलेखे दर्शवुन त्यानुसार देयकांची अदायगी केल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री पटवावी.

### 3.61 संगणक संचाची जादा दराने खरेदीबाबत.

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सामान्य प्रशासन विभाग व पंचायत विभागास लागणारे संगणक व प्रिटंरची खरेदी खालील तपशिलानुसार दर करारावर करण्यात आली असून प्रमाणक क्रमांक 189, दिनांक 18/02/2016 अन्वये रक्कम रुपये 2,85,889/- खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पाच संगणक संचाची व प्रिटंरची खरेदी करण्यासाठी वरीलप्रमाणे दरकरारानुसार पुरवठा करण्याचे आदेश मे.डीजीट कॉम्पुटर समतानगर उस्मानाबाद यांना देण्यात आले. त्यानुसार खालील तपशिलाप्रमाणे संगणक संचाचा व प्रिटंरचा पुरवठा करण्यात आला:-

संगणक संचाची खरेदी ही रूपये 46,725/- प्रती नग या दराने करण्यात आली आहे. परंतु, वरीलप्रमाणे नमुद संगणकाच्या दिनांक 24/03/2015 च्या सुधारीत दरकरारानुसार संगणक संचाची प्रती नग किंमत रूपये 44,500/- अशी असतांना वरीलप्रमाणे जादा दराने संगणक संचाची खरेदी करुन रक्क्म रूपये 11,125/- जादा प्रदान करण्यात आली आहे. जादा प्रदानाची रक्कम रूपये 11,125/- वसुल करुन शासन खाती भरणा करावी.